# मेहता मराठी ग्रंथजगत


डिसेंबर, २०१९ • पृष्ठे ६८ • किंमत : रु.१५ • वर्ष एकोणिसावे • अंक बारावा







## नाताळ आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!




### नवं कोरं


























**आसाम साहित्य सभेमार्फत** दिला जाणारा मानाचा **'डॉ. इंदिरा गोस्वामी राष्ट्रीय साहित्य पुरस्कार २०२०' ज्येष्ठ आणि श्रेष्ठ मराठी साहित्यिक विश्वास पाटील** यांना जाहीर झाला आहे. २ फेब्रुवारी, २०२० रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. हा पुरस्कार मिळवणारे विश्वास पाटील मराठीतील पहिले साहित्यिक आहेत. लेखकाचे पूर्व योगदान आणि समकालीन लेखन या निकषांवर हा पुरस्कार दिला जातो. पाटील यांच्या **'झाडाझडती'** या कादंबरीबरोबरच नुकत्याच प्रकाशित झालेल्या **'नागकेशर'** या कादंबरीचा या पुरस्कारासाठी विचार केला गेला आहे.




दुसऱ्या लेखक-प्रकाशक संमेलनाच्या अध्यक्षपदी **मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल मेहता** यांची एकमताने निवड झाली आहे. हे संमेलन २८, २९ डिसेंबर २०१९ रोजी चिपळूण येथे होणार आहे. या निवडीबद्दल त्यांचे **अभिनंदन करताना त्यांचे बंधू प्रदीप मेहता.** समवेत **मेहता बुक सेलर्सचे कर्मचारी.**

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ डिसेंबर २०१९ ◆ वर्ष एकोणिसावे ◆ अंक बारावा

**संपादक**
सुनील मेहता

**कार्यकारी संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*


— अनुक्रमणिका —


**संपादकीय** ४
**विशेष लेख** १०
**दिनविशेष** १४
**मागोवा** १८
**पुस्तक परिचय**
उत्तरकांड २८
प्रतिश्रुती : स्मरणयात्रा भीष्मांची ३२
अशी माणसे येती ३६
क्युअर ४२
रूप करा सुरूप ४८
एका लालसेने ५२
बेंजामिन फ्रँकलिन ५६
स्वजाणिवेतून स्वास्थ्यप्राप्ती ६०
**अभिप्राय**
मना सर्जना ६४



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय



## ... जुळल्या सगळ्या त्या आठवणी

बघता बघता २०१९ला निरोप द्यायची वेळ आली. वर्षं अशीच सरत असतात; पण लेखक/कवी/ साहित्यिक किंवा कोणतीही संवेदनशील माणसं त्या वर्षांना आपल्या लेखणीत धरून ठेवतात. कधी आत्मचरित्रातून/आत्मकथनातून, तर कधी चरित्रातून, तर कधी अनुभवकथनातून, तर कधी कवितेतून. भूतकाळाचं हे प्रत्येकाचं स्मरण वेगळं असतं. काहींचा भूतकाळ क्लेशदायक असतो, काहींचा संमिश्र, काहींचा सुखद... तर भूतकाळालाही अशा विविध छटा असतात.

व्यंकटेश माडगूळकर आपल्या जीवनातील एक विशिष्ट कालखंड 'कोवळे दिवस'मधून चित्रित करतात. स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतलेले माडगूळकर पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी गावी येतात. गुरं राखतात, चित्र काढतात, त्यांची बालमैत्रीण यमूची कर्मकहाणी ऐकतात. नंतर भूमिगत राहण्यासाठी दुसऱ्या गावात जातात. मित्राच्या घरी. तिथे उमावर त्यांचं मन जडतं इ. हकिकत माडगूळकरांच्या ओघवत्या लेखणीतून कागदावर उतरते. जिवावर बेतलेल्या लहानपणच्या काही आठवणीही माडगूळकरांनी सांगितल्या आहेत. 'करुणाष्टक' हे त्यांच्या आईचं स्मरणचित्र असलं तरी आपोआपच त्यांचा, त्यांच्या भावंडांचा लहानपणापासून ते प्रौढपणापर्यंतचा प्रवास त्यातून चित्रित होतो. 'माणदेशी माणसं' हीसुद्धा स्मरणचित्रंच आहेत. 'प्रवास एका लेखकाचा' हा तर माडगूळकरांच्या जीवनाचा समग्र प्रवास आहे.

शोभा चित्रेही आपल्या जीवनाचा प्रवास उलगडतात; पण थोड्या वेगळ्या अंगाने. त्यांच्या सासऱ्यांना जडलेला विस्मरणाचा आजार शोभाताईंना अस्वस्थ करतो. सासरे गेल्याची बातमी येते आणि त्या भूतकाळात शिरतात. त्यांच्या लग्नाची हकिकत, लग्न होईपर्यंतच्या

काळातल्या काही सुखद आठवणी. नंतर लग्न झाल्यानंतरच्या, नवऱ्याबरोबर परदेशात वास्तव्याला गेल्यानंतरच्या आठवणी, अर्थातच संसार, दोन मुलांचा जन्म, सासर-माहेरशी असलेला अनुबंध इ. गोष्टी उलगडत जातात. एका हुशार, कर्तबगार नवऱ्याच्या बायकोलाही स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व असतं आणि ते भावबंधांनी बहरलेलं आणि चिंतनशीलही असतं, याचा सुखद प्रत्यय 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकातून येतो.

'नाथ हा माझा' हे काशिनाथ घाणेकरांचं कांचन घाणेकरांनी लिहिलेलं चरित्र हेही एक स्मरणरंजन आहे. काशिनाथ घाणेकरांच्या अनेक आठवणींमधून त्या व्यक्ती म्हणून आणि कलावंत म्हणून घाणेकरांचं व्यक्तिमत्त्व उभं करतात. त्यांचं हे स्मरणरंजन तत्कालीन मराठी रंगभूमी आणि मराठी चित्रपटसृष्टीचंही दर्शन घडवतं. मराठी चित्रसृष्टीतील काही दिग्गज, माई मंगेशकर, लता मंगेशकर आणि जयप्रभा स्टुडिओ यांच्या संदर्भातील आठवणी कांचन घाणेकर यांनी जागवल्या आहेत त्यांच्या 'रेशीमगाठी' या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकातून. या आठवणी त्या लोकांशी असलेले त्यांचे भावबंध उलगडून दाखवतात.

तर, अशा असतात या आठवणी. त्या जेव्हा पुस्तकरूपाने समोर येतात, तेव्हा तो जरी लेखक/लेखिकेचा भूतकाळ असला तरी वाचकासाठी तो एक नवीन अनुभव असतो. तो भावात्मक असेल किंवा ज्ञानात भर घालणारा. वाचकाला कोणत्या ना कोणत्या प्रकारे समृद्ध करण्याचं काम या आठवणी करत असतात. या लेखक/लेखिकांनी मनाशी जपलेले हे क्षण काही वेळेस पुढच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरतात, काही वेळेस स्फूर्ती देतात, काही वेळेला अंतर्मुख करतात, काही वेळेला भावविवश करतात, तर काही वेळेला काळीज चिरत जातात. तर ही महती आहे पुस्तकरूपी स्मरणाची! पुस्तकरूपी 'आठवणी' हे काळाच्या विस्तीर्ण पटावर मनाला उभारी देणारं एक ओॲसिस आहे. नाही का?



## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

## WORDPOWER

### बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

## डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

*Available on*
play.google.com / store / books
www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**


amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

## नवं कोरं

# चेहऱ्यामागची रेश्मा

**रेश्मा कुरेशी**

सहलेखक
तानिया सिंग

अनुवाद
निर्मिती कोलते





१९ मे २०१४ या दिवशी सतरा वर्षांची रेश्मा कुरेशी परीक्षा द्यायला म्हणून बाहेर पडली आणि काही क्षणांतच होत्याचं नव्हतं झालं. काही लोकांनी तिला पकडून जमिनीवर पाडून केस मागे ओढत तिच्या चेहऱ्यावर ॲसिड ओतलं. जिवंत प्रेताप्रमाणे काही क्षणांतच तिचं शरीर जळू लागलं. त्वचेला जाळत जाळत हाडापर्यंत ॲसिड जाऊन पोहोचलं; पण तिच्या हृदयातील जगण्याची ठिणगी मात्र विझवू शकलं नाही.

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# कहाणी पहिल्या आगीनगाडीची

**राजेंद्र आकलेकर । अनुवाद : रोहन टिल्लू**




ही आहे भारतातील पहिल्या रेल्वेमार्गाची कथा! मुंबईच्या व्हिक्टोरिया टर्मिनसपासून ते उत्तर दिशा या मूळ रेल्वेमार्गावर पडलेले अवशेष खूप महत्त्वाचे आहेत. त्या काळातल्या तंत्रज्ञानाबद्दल ते माहिती देतात. GIPR म्हणजे मध्य रेल्वे आणि BB&CI म्हणजे पश्चिम रेल्वे यांची रचना कशी झाली, हे इत्थंभूत सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकामध्ये केला आहे.

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# विशेष लेख

## झाडाच्या खोडात सजलेले अद्‌भुत वाचनालय

*वाचनालय म्हटलं की चार भिंतींमध्ये काही कपाटांमध्ये ठेवलेली पुस्तकं, असं काहीसं दृश्य आपल्या नजरेसमोर येतं; पण इदाहो येथील ग्रंथपाल आणि कलाकार असलेल्या शर्ली हॉवर्ड यांनी ११० वर्षांच्या वृक्षाच्या खोडात एका वाचनालयाची निर्मिती केली. त्या अद्‌भुत वाचनालयाची ही रोचक कहाणी...*

आजच्या युगात आपण एकमेकांशी सहजगत्या जोडले गेलो आहोत. नुसतं एक बटण दाबायचा अवकाश, माहितीची गंगा आपल्या अंगणात वाहू लागते. तरीसुद्धा छापील पुस्तकांची जादू जराही कमी होत नाही. एखाद्या गोष्टीच्या पुस्तकात स्वत:ला हरवून जात सावकाश आणि मनापासून वाचन करण्याचा आनंद अवर्णनीय असतो. त्या तुलनेत, स्क्रोल करत राहण्याचा मोह फिका पडतो. वाचनातून उन्नती आणि प्रगती तर होतेच, पण सूक्ष्म विचार करायला आपण प्रवृत्त होतो. आपल्यात परानुभूतीची भावना जागते. आज या दोन्ही महत्त्वाच्या गोष्टींची जगात वानवा भासू लागली आहे.

'लिटल फ्री लायब्ररी' हे 'ना नफा' तत्त्वावर चालणारं वाचनालय असून, लोकांना प्रेरणा देणं आणि एकमेकांमध्ये पुस्तकांची देवघेव करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करून त्यांच्यात सामाजिकता वाढीला लावणं हा त्यामागचा उद्देश आहे. २००९ मध्ये स्थापना झाल्यापासून आजपर्यंत संस्थेने ८८ देशांत ७५,००० छोटेखानी वाचनालयांची उभारणी करण्यास साहाय्य केलं असून, प्रति वर्षी लाखो पुस्तकांची देवाणघेवाण होत आहे. यातून, जगभरात पुस्तकांबद्दलचं प्रेम वाढीला लागण्यास मदत होते आहे.

या वाचनालयांपैकी सर्वांत देखणं म्हणता येईल असं वाचनालय इदाहो येथील कोर डी'अलेन या कुटुंबाने उभारलं. शर्ली आर्मिटेज हॉवर्ड या

ग्रंथपाल, कलाकार आणि पुस्तकबांधणी करणाऱ्या व्यावसायिक होत्या. त्यांच्या अंगणातील ११० वर्षं वयाच्या कॉटनवूड वृक्षाचं प्रचंड खोड उखडून नष्ट करण्याऐवजी 'लिटल ट्री लायब्ररी' करण्याच्या दृष्टीने ते उत्तम आहे, हे त्यांच्या लक्षात आलं. ''एखाद्या खोडाला नवीन आयुष्य देण्यासाठी वेळ काढू इच्छिणारी व्यक्ती त्यासाठी एखादं निरोगी झाड कधीही कापणार नाही,'' असं शर्ली यांनी बोअर्ड पांडा यांना सांगितलं. ''गेली कित्येक वर्षं



त्याच्या भल्या मोठ्या फांद्याा रस्त्यावर आणि बाजूच्या पदपथावर कोसळत होत्या (अगदी, वारंवादळ नसतानासुद्धा). कधी तरी कुणाला तरी दुखापत झाली तर काय, याची काळजी आम्हाला लागून राहिली होती. शेवटी, आमच्या मुलाच्या गाडीवर पडलीच एक फांदी.''

''साधारणत:, कॉटनवूडचं झाड ४०-५० वर्षं जगतं..., म्हणजेच आत्तापर्यंत त्याला दुप्पट वर्षं जगायला मिळालं होतं!'

झाडाच्या खोडाला बाहेरच्या बाजूने कोरण्यात आलं. त्यावर एक मस्त छप्पर चढवण्यात आलं. आणि आतल्या बाजूला उबदार वाटेल अशी सजावट करण्यात आली. त्यानंतर, बाहेरच्या बाजूने जी लाईटची सजावट करण्यात आली, त्यामुळे तर त्या झाडाला अगदी परीकथेचं रूप प्राप्त झालं. आजवर इतकं सुंदर वाचनालय आम्ही कधीच पाहिलं नव्हतं. तुम्ही जर इथे स्क्रोल डाऊन केलंत तर तुम्हालाही पाहता येईल ते वाचनालय. मग तुम्ही स्वत:साठी पटकन एक पुस्तकसुद्धा उचलू शकता!''

शर्ली यांची लिटल फ्री लायब्ररी लोकांना फार आवडली आहे! त्यातील काही लोकांच्या या प्रतिक्रिया :

Bfloblizzar **:** तुम्ही जेव्हा खुंटता आणि तुम्हाला कशाचा तरी शोध घेण्याची आस वाटते, तेव्हा तुम्ही जाऊ शकता अशी जागा.

**Enzo GS (एन्झो जीएस) :** मी कॅनडा इथे राहत असताना माझ्या घराजवळ असंच एक वाचनालय होतं. मला वाटतं की, ते खरं तर वाचनालय नसावं. साधारणत:, 'घ्या आणि द्या' असं काहीसं स्वरूप होतं त्याचं. तुम्हाला हवं असलेलं पुस्तक त्यात असेल तर ते तुम्ही घ्या आणि तुमच्याकडे असलेलं पुस्तक तुम्हाला नको असेल, तर ते तिथे चक्क दान करा, असा प्रकार होता. थोडीफार पुस्तकं तिथे नेहमी असायची.

**Sekhmet (सेखमेट) :** मी जर्मनीमध्ये राहते. आमच्याकडे अशी काही वाचनालयं आहेत. बहुतेक सर्व ठिकाणी खच्चून पुस्तकं भरलेली आहेत. मला तर तिथे नेहमीच फार मस्त पुस्तकांचं घबाड सापडलेलं आहे... अगदी मोलिअरपासून डिकन्सपर्यंत सगळे. काय धम्माल! मी जितकी पुस्तकं तिथून घेते तितकीच तिथे ठेवतेसुद्धा. सामाजिकता आणि एकत्र येण्याची भावना जोपासण्याच्या दृष्टीने हे पूरक आहे.

**Pinniped (पिनिपेड) :** बाप रे बाप! आजवर मी बघितलेल्या 'लिटल फ्री लायब्ररी' पैकी ही सर्वोत्तम लायब्ररी आहे. फारच भारी!

**Lynda Thornton (लिन्डा थॉर्नटन) :** नुकतंच माझ्या कझिनने हे पोस्ट केलं. पाहता क्षणी प्रेमात पडले मी! मला स्वत:ला येऊन ते प्रत्यक्षात पाहायची प्रचंड इच्छा झाली. तुम्ही आणि तुमचे कुटुंबीय अगदी भारी

आहात. कसं काय जमवलं असेल इतकं सगळं ते तुम्हालाच ठाऊक! जगाने तुमच्याकडून धडे गिरवायला हवेत. आपण इतक्या दूर नसतो तर फार बरं झालं असतं. (मी इंडियाना इथे राहते.) अशा मस्त ठिकाणी जायला आवडेल मला.

**June Brust (जून ब्रस्ट) :** काय सुरेख कल्पना आहे ही!

**Pecesme McCarthy (पेसेमे मॅककार्थी) :** हॉबिटचं कसलं जबरदस्त घर झालं असतं! धम्माल कल्पना!

**CassButton (कॅसबटन) :** गॉब्लीन आणि पऱ्या राहू शकतील असं जादुई घर आहे हे तर!

**Bradley Rene' Gracia (ब्रॅडली रेने' ग्रॅसिया) :** फारच मस्त, काळाच्या पुढे केलेला विचार. इतरांनासुद्धा ज्ञान देऊन त्यांची उंची वाढवणं. खरी भेट म्हणावी लागेल ही!

**Karen Yde Frokjaer (कॅरेन येडे फ्रोकजियर) :** वा! वाह! अप्रतिम! अचाट कल्पना!

असं काही आजवर पाहिलं नाही. काय प्रचंड काम केलं आहे!

**Barbara Bowers (बार्बरा बॉवर्स) :** बुटात राहणाऱ्या म्हातारीची आठवण झाली पटकन. फार मस्त कल्पना आहे बुवा. त्यातून, मोफत वाचनालयात रूपांतर करण्याची कल्पना फार कमाल!

**Jean Vanzura Donley (जीन वांझुरा डोनले) :** कल्पनातीत सुंदर प्रकल्प. त्यातून खूप समाधान मिळालं असेल याची मला खात्री आहे.

**Rosalyn Gilliam (रोजलिन गिलियम) :** फारच सुंदर आणि छान असं वाचनालय आहे ते.

◆

## अभिप्राय

'अनू'प वाचतोय. 'सर्वत्र फक्त प्रेमच आहे' असं कुणी कसं म्हणू शकतं, हा प्रश्न पडला होता सुरुवातीला. ते कसं याचा प्रत्यय घेतोय पानोपानी. एका ज्ञानवंत सुंदर स्त्रीच्या वाट्याला आलेल्या खडतर प्रवासाची आणि तशातही साक्षात मृत्यूच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन घेतलेल्या आत्मशोधाची ही अत्यंत प्रेरक कथा मराठीत आणल्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन आणि खूप खूप धन्यवाद!

**- दत्ता चव्हाण**

**१६ डिसेंबर २०१९ ते १५ जानेवारी २०२० दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ डिसेंबर २०१९ दरम्यान खास सवलत**

**१६ डिसेंबर - जॅन येगर यांचा जन्मदिन**

'मैत्री अशी आणि तशी...', 'वर्क लेस, डू मोअर' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५४५/- । सवलत किंमत ३९९/-**

**२० डिसेंबर - मॅथ्यू ग्लास यांचा जन्मदिन**

'एन्ड गेम', 'अल्टिमेटम' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ५४९/-**

**२१ डिसेंबर - यू. आर. अनंतमूर्ती यांचा जन्मदिन**

'संस्कार', 'अवस्था' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २९०/- । सवलत किंमत १९९/-**

**२४ डिसेंबर - प्रा. डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांचा जन्मदिन**

'ग़ज़ल', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ४९९/-**

**२८ डिसेंबर - जॉन ग्रे यांचा जन्मदिन**

''स' सुखाचा', 'तो आणि ती', 'तुला आठवताना' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८८५/- । सवलत किंमत ५९९/-**

**३० डिसेंबर - जयसिंगराव पवार यांचा जन्मदिन**

'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'शिवछत्रपती : एक मागोवा', 'मराठेशाहीचे

अंतरंग', 'छत्रपती संभाजी : एक चिकित्सा', 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास' (लेखिका - वसुधा पवार) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १८३०/- । सवलत किंमत १२९९/-**

**३१ डिसेंबर - मेगन चान्स यांचा जन्मदिन**

'द स्पिरिच्युॲलिस्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

**खालील संचांवर १ ते १५ जानेवारी २०२० दरम्यान खास सवलत**

**१ जानेवारी - मायकेल गेट्स गिल यांचा जन्मदिन**

'हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाइफ' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१९/-**

**१ जानेवारी - पॉल कार्सन यांचा जन्मदिन**

'बिट्रेयल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**१ जानेवारी - ॲनी बरोज यांचा जन्मदिन**

'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

**३ जानेवारी - जसवंत सिंग यांचा जन्मदिन**

'ए कॉल टू ऑनर', 'जिना-हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ४४९/-**

**३ जानेवारी - सावित्रीबाई फुले यांची जयंती**

'महात्मा (जोतिराव फुले)', 'मी मलाला', 'स्टोन्स इन्टू स्कूल्स', 'थ्री कप्स ऑफ टी', 'माय नेम इज परवाना' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १६८५/- । सवलत किंमत ९९९/-**

**४ जानेवारी - कृष्णाजी कुलकर्णी यांचा जन्मदिन**

'मराठी भाषा उद्गम व विकास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत १९९/-**

**८ जानेवारी - विल्बर स्मिथ यांचा जन्मदिन**

'द सेव्हन्थ स्क्रोल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २७९/-**

**९ जानेवारी - शोभा चित्रे यांचा जन्मदिन**

'एक दिवस', 'पानगळीच्या आठवणी ' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २४९/-**

**१० जानेवारी - निरंजन घाटे यांचा जन्मदिन**

'ज्याचं करावं भलं', 'तरुणांनो होशियार', 'पर्यावरण प्रदूषण', 'वेध पर्यावरणाचा', 'ज्ञानदीप', 'वसुंधरा', 'जिज्ञासापूर्ती', 'फार फार वर्षांपूर्वी', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'रोबॉट फिक्सिंग', 'स्वप्नचौर्य', 'शास्त्रज्ञांचे जग', 'असे शास्त्रज्ञ असे संशोधन', 'आल्फ्रेड रसेल वॅलेस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ३२३०/- । सवलत किंमत १९४९/-**

**११ जानेवारी - अनू अगरवाल यांचा जन्मदिन**

'अनू'प या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

**११ जानेवारी - वि. स. खांडेकर यांचा जन्मदिन**

'वि. स. खांडेकर लिखित' **११९** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १६,५५५/- । सवलत किंमत ९७९९/-**

**१२ जानेवारी - स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन व जागतिक युवा दिन**

'आधुनिक भारताचे प्रेषित : स्वामी विवेकानंद', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'चिकन सूप फॉर द टीनएज सोल', भाग -१, भाग - २, 'मैत्री अशी अन् तशी', 'स्वामी विवेकानंद', 'टीनएजर्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १९५०/- । सवलत किंमत ११४९/-**

**१४ जानेवारी - डेव्हिड कर्कपॅट्रिक यांचा जन्मदिन**

'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २२९/-**

**१४ जानेवारी - अपर्णा परचुरे यांचा जन्मदिन**

'केक्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ७९/-**

**(२५ डिसेंबर रोजी 'ख्रिसमस' निमित्ताने सर्व बालवाङ्मयावर ४० टक्के सूट)**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क : फोन :** ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **WhatsApp No. ९४२०५९४६६५**

**Website : www.mehtapublishinghouse.com**

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ई-मेल वर पाठवा**

**authors@mehtapublishinghouse.com**


# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* इतर पुस्तके २०% सवलतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

# मागोवा

*नेहमीप्रमाणेच या वर्षीही (२०१९) पुस्तक प्रकाशन सोहळे, काही उपक्रम आम्ही पार पाडले आणि बाहेरील काही कार्यक्रमांमध्येही आमचा सहभाग होता. तसेच या वर्षीही आम्हाला काही पुरस्कार प्राप्त झाले. तर या प्रकाशन सोहळ्यांवर, उपक्रमांवर, अन्य कार्यक्रमांवर आणि पुरस्कारांवर टाकलेला हा दृष्टिक्षेप...*

**प्रकाशने**

एकाच घरातील तीन पिढ्यांच्या तीन पुस्तकांचं एकत्रित प्रकाशन करण्याचा योग या वर्षी जुळून आला. **पु. श्री. काळे** यांचं **'ललित कलेच्या सहवासात'**, **व. पु. काळे** यांचं **'जपुन टाक पाऊल'** आणि **स्वाती चांदोरकर** यांचं **'शेष'**... ही अनुक्रमे तीन पिढ्यांची तीन पुस्तकं. या पुस्तकांचं प्रकाशन ज्येष्ठ अभिनेता विक्रम गोखले, ज्येष्ठ अभिनेता शरद पोंक्षे, लेखिका स्वाती चांदोरकर आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आलं.

सिद्धहस्त लेखक **विश्वास पाटील** यांच्या **'नागकेशर'** या कादंबरीचं प्रकाशन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस, ज्येष्ठ लेखिका अश्विनी धोंगडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, लेखक विश्वास पाटील, प्रकाशक सुनील मेहता आदी मान्यवरांच्या उपस्थितीत एका शानदार समारंभात पार पडलं. मेहता पब्लिशिंग हाऊस, महाराष्ट्र साहित्य परिषद, भोसरी आणि सीओईपी मराठी वादविवाद मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. कोल्हापूर येथेही **'नागकेशर'** या पुस्तकाचं श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते आणि अनिल-सुनील मेहता, प्रा. रणधीर शिंदे यांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आलं.

**डॉ. अतुल गवांदे** लिखित आणि **सुनीति काणे** अनुवादित **'बेटर'**

आणि **टॉड बर्पो, लीन व्हिन्सेन्ट** लिखित आणि **मेधा मराठे** अनुवादित **'स्वर्गाचा साक्षात्कार'** या पुस्तकांचं प्रकाशन ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. संजय देवधर यांच्या हस्ते करण्यात आलं. या वेळी सुनीति काणे, मेधा मराठे, एस. पी. कॉलेजचे प्राचार्य दिलीप शेठ, एस. पी. कॉलेजच्या मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अरविंद काकुळते उपस्थित होते.

**कॅप्टन दिलिप दोंदे** यांच्या **'द फर्स्ट इंडियन'** या पुस्तकाच्या **'सागरी परिक्रमेचा पराक्रम'** या मराठी आवृत्तीचं प्रकाशन निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले यांच्या हस्ते आणि सुनील मेहता, कॅप्टन दिलिप दोंदे, एव्हरेस्टवीर हृषीकेश यादव, अनुवादक मुक्ता देशपांडे यांच्या उपस्थितीत करण्यात आलं.

**उपक्रम**

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे श्री छत्रपती शिवाजी महाराज निकेतन क्रमांक १ या महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सॅन्ताक्लॉजच्या हस्ते नाताळनिमित्त खाऊ व गोष्टीच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि एस. पी. कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त **रणजित देसाई** लिखित **'श्रीमान योगी'**च्या अभिवाचनाचं आयोजन करण्यात आलं होतं. इतिहास अभ्यासक अनिरुद्ध पाठक यांनी हे अभिवाचन केलं.

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि प्रेरणा कला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने **शंकर पाटील** लिखित **'धिंड'** आणि **रणजित देसाई** लिखित **'शेकरा'** या पुस्तकांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

२१ मार्च या कविता दिनी मेहता पब्लिशिंग हाऊस आणि अंतर्नाद कला संस्था यांच्या वतीने 'कविकट्ट्या'चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास उपस्थित कवींनी त्यांच्या अनुभवातून आणि विचारांमधून साकारलेल्या कविता सादर केल्या.

**'बालक-पालक आणि बालसाहित्य'** या विषयावर ज्येष्ठ बाल साहित्यिक **राजीव तांबे** यांच्या उपस्थितीत कार्यशाळा घेण्यात आली.

भारतात शिक्षणासाठी आलेल्या मॉरिशसच्य विद्यार्थिनींशी **'भाषासंवादिनी'** या कार्यक्रमाद्वारे ज्येष्ठ साहित्यिक **श्याम भुर्के** यांनी संवाद साधला.

**'विज्ञानाच्या गमतीजमती'** हा कार्यक्रम बालक-पालक आणि **'बीइंग**

**जिज्ञासू'** या टीमच्या सदस्यांसह रंगला.

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि **'घरटं – द फर्स्ट इनिंग्ज हाऊस'** यांच्या संयुक्त विद्यमाने **अनिरुद्ध पाठक** यांच्या उपस्थितीत वाचनकट्ट्याचं आयोजन केलं गेलं.

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि **'घरटं – द फर्स्ट इनिंग्ज हाऊस'** यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उन्हाळी शिबिरात बालक-पालक असा गप्पागोष्टींचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात बालसाहित्यिक **राजीव तांबे** यांनी बालगोपाळांशी गप्पागोष्टी केल्या.

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि **जस्ट बुक्स लायब्ररी, कोथरूड** यांच्या संयुक्त विद्यमाने लहान मुलांसाठी कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यशाळेत **कथाश्रवण** आणि **चित्रकलेचा** आनंद बाळगोपाळांनी घेतला.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे **सीनिअर-ज्युनिअर वाचनकट्ट्याचं** आयोजन करण्यात आलं होतं. त्याअंतर्गत **'मृत्युंजय'** कादंबरीचं अभिवाचन करण्यात आलं.

मेहता पब्लिशिंग हाऊसने **'उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी'** या पुस्तकाच्या अभिवाचनाचं आयोजन केलं होतं. सुरुवातीला 'उपयोजित समीक्षा...' या पुस्तकातील **'श्री. विजय तेंडुलकर यांचे 'शांतता, कोर्ट चालू आहे' : मानसशास्त्रीय अवलोकन'** या लेखाचं अभिवाचन करण्यात आलं. ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक **डॉ. अरविंद वामन कुळकर्णी** यांचे सुपुत्र आणि अभिनेते **अभय कुळकर्णी** यांनी हे अभिवाचन केलं.

**अन्य कार्यक्रम**

पुस्तकांचं गाव भिलार येथे **लेखक-प्रकाशक संमेलन** पार पडलं. त्या संमेलनात **'वाचनसंस्कृती'** या विषयावर एक परिसंवाद घेण्यात आला. त्या परिसंवादात **अनिल मेहता** यांनी सहभाग नोंदवला.

**अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघा**तर्फे एका **चर्चासत्राचं** आयोजन करण्यात आलं होतं, ज्यामध्ये **अनिल मेहता** आणि **सुनील मेहता** यांचा सहभाग होता. या चर्चासत्रात **'पुस्तकविक्री'** या विषयावर **सुनील मेहता** यांनी आपले विचार मांडले.

**पुरस्कार**

**दिनमार्क पब्लिकेशन्सतर्फे** घेण्यात आलेल्या **छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक** स्पर्धेत **मेहता मराठी ग्रंथजगतच्या २०१८ च्या दिवाळी अंकास 'दखलपात्र दिवाळी अंक निर्मिती'चा प्रथम क्रमांकाचा 'सौ. कमलाबाई रसिकलाल धारिवाल' पुरस्कार** प्राप्त झाला.

**पुणे मराठी ग्रंथालयातर्फे 'रेझोनान्स' या अजय पांडे लिखित आणि उज्ज्वला गोखले** अनुवादित कादंबरीला **उत्कृष्ट साहित्यकृती** म्हणून गौरवण्यात आले.

**साहित्यप्रेमी भगिनी मंडळ (पुणे)** यांच्यातर्फे **डॉ. उमा कुलकर्णी** यांच्या **'संवादु अनुवादु'** या आत्मकथनास आणि **योजना यादव** यांच्या **'मरी मरी जाय सरीर'** या काव्यसंग्रहास पुरस्कार देण्यात आला. याच काव्यसंग्रहासाठी **योजना यादव** यांना **नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे 'विशाखा' पुरस्काराने** गौरविण्यात आले. **उमा कुलकर्णी** यांना **'संवादु-अनुवादु'**साठी **मुंबई मराठी संग्रहालयाचा सर्वोत्कृष्ट आत्मकथनाचा प्रा. वि. ह. कुलकर्णी पुरस्कार** प्राप्त झाला.

**सार्वजनिक वाचनालय, नाशिक** यांच्या वतीने **उत्कृष्ट कादंबरीसाठी** दिला जाणारा **स्व. धनंजय कुलकर्णी** पुरस्कार **अभिजित कुलकर्णी** यांच्या **'रेड टेप'** कादंबरीला मिळाला.

**आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट** यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा सन २०१८ या वर्षातील **उत्कृष्ट गद्य साहित्यकृती पुरस्कार डॉ. कीर्ती मुळीक आणि अप्पासाहेब जकाते-यादव** यांनी संपादित केलेल्य **'डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास'** या ग्रंथास प्राप्त झाला.

**'कांगारू देशीच्या गोष्टी'** या मालिकेतील **'नववर्षाची अनपेक्षित भेट'** या **ख्रिस्तोफर चेंग** आणि **दी वू** लिखित आणि **मालविका आमडेकर** अनुवादित पुस्तकास **'द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स'**तर्फे **प्रादेशिक भाषेतील बालसाहित्याचा सर्वोत्कृष्ट निर्मिती प्रथम पुरस्कार (वार्षिक) २०१८** प्राप्त झाला.

◆

## २०१९ साली प्रकाशित पुस्तकांची यादी

### कादंबरी

| | | |
|---|---|---|
| **नागकेशर** | विश्वास पाटील | ४५० |
| **आकाश झेलताना** | मंजुश्री गोखले | १९५ |
| **धीवराची आर्त साद** | | |
| : बेलिंडा व्हिएगस | अनु. श्यामल चितळे | २९५ |
| **सुर्वंता** | बा.ग.केसकर | १८० |
| **फोर सीझन्स** | शर्मिला फडके | ३९५ |
| **द फुल कबर्ड ऑफ लाईफ** | | |
| : अलेक्झांडर स्मिथ | अनु. नीला चांदोरकर | २५० |
| **सँक्टस** : सायमन टॉएन | अनु. उदय भिडे | ६०० |
| **मायक्रो** | | |
| : मायकेल क्रायटन | | |
| आणि रिचर्ड प्रेस्टन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४५० |
| **माय नेम इज परवाना** | | |
| : डेबोरा एलिस | अनु. अपर्णा वेलणकर | २४० |
| **क्युअर** : रॉबिन कुक | अनु. अनिल काळे | ४८० |
| **उत्तरकांड** : एस.एल.भैरप्पा | अनु. उमा कुलकर्णी | ३९५ |
| **प्रतिश्रुती : स्मरणयात्रा भीष्मांची** | | |
| : ध्रुव भट्ट | अनु. अंजनी नरवणे | ३३० |
| **वारूळ** | बाबाराव मुसळे | ५९५ |
| **कॉर्पोक्षेत्र** : दीपक कौल | अनु. सावनी केळकर | १८० |
| **नाकोहस** : पुरुषोत्तम अग्रवाल | अनु. सुनीता देवस्थळी | १९५ |
| **द किल लिस्ट** : फ्रेडरिक फोरसाइथ | अनु. बाळ भागवत | ३५० |
| **एच.एम.एस. युलिसिस** | | |
| : ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अनिल काळे | ४५० |
| **आहे कट्टर तरी...** : तहमिमा अनम | अनु. भारती पांडे | ३९५ |
| **झुबेदा** : तहमिमा अनम | अनु. सरिता आठवले | ४९५ |

### 'अमेरिकन क्लासिक्स' (अनुवाद/रूपांतर)

| | | |
|---|---|---|
| **पाचूचे बेट** : हर्मन मेलव्हिल | अनु. भानू शिरधनकर | २४० |
| **शिस्तीचा बळी** : हर्मन मेलव्हिल | अनु. भानू शिरधनकर | १०० |
| **घणघणतो घंटानाद** | | |

| | | |
|---|---|---|
| : अर्नेस्ट हेमिंग्वे | अनु. दि.बा.मोकाशी | ५५० |
| **आगे बढो** : जे.एल.लेथम | अनु. विजय तेंडुलकर | २०० |
| **भल्या दिलाचा माणूस** | | |
| : जॅक शॅफिर | अनु. विजय तेंडुलकर | २०० |
| **देवाची माणसे** : विला कॅथर | अनु. विजय तेंडुलकर | २८० |

**कथासंग्रह**

| | | |
|---|---|---|
| **त्रिशंकू** : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १९० |
| **डव्हाळं** | बा.ग.केसकर | १८० |
| **'एका लालसेने'** : मंजुल बजाज | अनु. डॉ.शुचिता नांदापूरकर-फडके | ३२० |
| **वडाच्या झाडाखाली आणि इतर गोष्टी** | | |
| : आर.के.नारायण | अनु. नंदिनी देशमुख | ३०० |
| **ट्वेल्व्ह रेड हेरिंग्ज** | | |
| : जेफ्री आर्चर | अनु. डॉ. देवदत्त केतकर | ३०० |

**अनुवादित सत्यकथा**

| | | |
|---|---|---|
| **घरपरतीच्या वाटेवरती...** | | |
| : सरू ब्रायर्ली | अनु. लता रेळे | २५० |

**अनुवादित अनुभवकथन**

| | | |
|---|---|---|
| **आयडिया मॅन** : पॉल ॲलन | अनु. स्वाती देशपांडे | ४९५ |
| **स्वर्गाचा साक्षात्कार** : टॉड बर्पो | अनु. मेधा मराठे | १९५ |
| **दिव्यगुणी** | | |
| : सुधा मेनन आणि व्ही.आर.फिरोज | अनु. सुमिता बोरसे | २९५ |
| **पिझ्झा टायगर** : टॉम मोनाघन | अनु. डॉ. सुधीर राशिंगकर | ४२० |
| **'अनू'प** : अनू अगरवाल | अनु. सुप्रिया वकील | २५० |
| **सागरी परिक्रमेचा पराक्रम** | | |
| : दिलिप दोंदे | अनु. मुक्ता देशपांडे | ३९५ |
| **ते १२७ तास!** : ॲरन राल्स्टन | अनु. रेश्मा कुलकर्णी-पाठारे | ३६० |

**अनुवादित आत्मकथन**

| | | |
|---|---|---|
| **आयुष्याचा अंतिम संस्कार** | | |
| : फिलिप गूल्ड | अनु. डॉ. अजेय हर्डीकर | १८० |
| **कॉर्पोरेटला रामराम, शेतीला सलाम!** | | |

: वेंकट अय्यर अनु. दीपक कुळकर्णी २९५

**लेट हर फ्लाय**

: झियाउद्दीन युसफझाई अनु. डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके १९५

**द लास्ट गर्ल** : नादिया मुराद अनु. सुप्रिया वकील ३९५

**चेहऱ्यामागची रेश्मा** : रेश्मा कुरेशी अनु. निर्मिती कोलते २६०

### अनुभवकथन

**रंगल्या रात्री** संपादन : अरुण शेवते १६०

**रात्ररंग** संपादन : अरुण शेवते २९५

**चित्तचित्रे** संपादन : अरुण शेवते १८०

**स्वप्नी जे देखिले** संपादन : अरुण शेवते १८०

**मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी !** संपादन : अरुण शेवते २५०

### अनुवादित चरित्रे / व्यक्तिचरित्रे

**अशीच काही पानं**

: संपादन आणि शब्दांकन : वैदेही अनु. उमा कुलकर्णी १३०

**बेंजामिन फ्रँकलिन** : लेविस लेअरी अनु. सई साने २४०

**महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष**

: जोसेफ लेलिव्हेल्ड अनु. मुक्ता शिरीष देशपांडे ४९५

### व्यक्तिचित्रे

**अशी माणसे येती** वसंत जोशी १९०

### इतिहासपर

**दडलेला इतिहास**

: जेरी डॉशेर्टी आणि जिम मॅकग्रेगर अनु. स्नेहलता जोशी ६५०

### माहितीपर

**सत्तरीतला भारत** : रोशन दलाल अनु. जोसेफ तुस्कानो ३९५

**कहाणी पहिल्या आगीनगाडीची**

: राजेंद्र भा. आकलेकर अनु. रोहन टिल्लू ३५०

**नेव्हर मॅरी अ वुमन विथ बिग फीट**

: मिनेक शिप्पर अनु. वर्षा वेलणकर ६५०

### आरोग्यपर

**रूप करा सुरूप** : जेसिका वू अनु. डॉ. मीना शेटे-संभू ४६०

**स्वजाणिवेतून स्वास्थ्यप्राप्ती**
: डॉ. न्यूटन कोन्दाविती — अनु. डॉ. अश्विनी घैसास — १९५

## मार्गदर्शनपर

**टीनएजर्स** : डेव्हिड बेनब्रिज — अनु. डॉ. अस्मी अच्युते — ३५०
**आनंदतरंग** : ग्रेचेन रुबिन — अनु. अश्विनी तापीकर-कंठी — ३५०
**बेटर** : अतुल गवांदे — अनु. सुनीति काणे — २९५
**प्रभावशाली संभाषणाचा झटपट व सोपा मार्ग**
: डेल कार्नेगी — अनु. शुभदा विद्वांस — २००
**आवश्यक अशी पाच लोककौशल्ये**
: डेल कार्नेगी ट्रेनिंग — अनु. शुभदा विद्वांस — २००
**स्वतःला अविस्मरणीय बनवा**
: डेल कार्नेगी ट्रेनिंग — अनु. शुभदा विद्वांस — २००
**प्रतिभेचा इंद्रधनू** : जोनाह लेहरर — अनु. डॉ. अजेय हर्डीकर — २५०
**परमसुखाची पर्वणी**
: परमपूज्य दलाई लामा आणि आर्चबिशप डेस्मंड टुटू — अनु. मुक्ता देशपांडे — ३९५
**धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर...**
: परमपूज्य दलाई लामा — अनु. रोहन टिल्लू — २४०

## लेखसंग्रह

**कल्पनातरंग** : वि. स. खांडेकर — संपा.डॉ.सुनीलकुमार लवटे — १९५
**समुद्रमंथन** : वि. स. खांडेकर — संपा.डॉ.सुनीलकुमार लवटे — २७०
**वैनतेय** : वि. स. खांडेकर — संपा.डॉ.सुनीलकुमार लवटे — ३००
**वाङ्मयविचार** : वि. स. खांडेकर — संपा.डॉ.सुनीलकुमार लवटे — २३०

## समीक्षात्मक लेखसंग्रह

**प्रज्ञा आणि प्रतिभा**
: वि.स.खांडेकर — संपा.डॉ. सुनीलकुमार लवटे — २७०
**साहित्यप्रतिभा, सामर्थ्य आणि मर्यादा**
: वि.स.खांडेकर — संपा.डॉ. सुनीलकुमार लवटे — १६०
**आचार्य अत्रे - बारा गावचं पाणी** — ॲड. बाबूराव कानडे — २२०
**काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र** — ॲड. बाबूराव कानडे — २२०

### विनोदी लेखसंग्रह

**गाढवाची गीता आणि गाजराची पुंगी**
: वि.स.खांडेकर — संपा.डॉ. सुनीलकुमार लवटे २५०

### ललित

**साहेब संध्याकाळी भेटले** — अरुण शेवते — १२०
**हेल मेट्स** — डॉ नंदकुमार उकडगावकर — १८०

### आध्यात्मिक

**संवाद परमेश्वराशी भाग ३**
: नील डोनाल्ड वॉल्श — अनु. डॉ. वृषाली पटवर्धन — ४५०

### भाषणसंग्रह

**स्वप्नसृष्टी : वि.स.खांडेकर** — संपा. डॉ. सुनीलकुमार लवटे २७०

### शब्दकोश

**अभिनव मराठी-मराठी-इंग्रजी**
**पर्याय शब्दकोश** — वि.शं.ठकार — ६३०

### विज्ञानविषयक

**अंतराळ स्पर्धा** — अतुल कहाते — २५०
**अशक्य भौतिकी** : मिचिओ काकू — अनु. लीना दामले — ३५०

### विज्ञान कथासंग्रह

**डिंभक** — डॉ. संजय ढोले — १९५
**इ.स. २५९५**
: डॉ. कल्पना कुलश्रेष्ठ — अनु. मीरा नांदगांवकर — २४०

### गूढकथा

**मगरडोह** — शशिकांत काळे — २००

### बालसाहित्य

**गोष्ट डॉट कॉम (बालांसाठी)** — ज्ञानदा नाईक
**भाग १** — (३ पुस्तकांच्या संचाची किंमत २१०)
**भाग २** — (३ पुस्तकांच्या संचाची किंमत २१०)
**भाग ३** — (४ पुस्तकांच्या संचाची किंमत २८०)
**निसर्ग आणि इतर गोष्टी** — मधुमती शिंदे
(५ पुस्तकांच्या संचाची किंमत ३५०)

◆

# सत्तरीतला भारत




**रोशन दलाल**


**अनुवाद : जोसेफ तुस्कानो**

१९४७ हे साल स्थित्यंतराचं ठरलं... सुमारे २०० वर्षांच्या ब्रिटिश राजवटीनंतर, भारत देशाला एक स्वतंत्र राजकीय अस्तित्व मिळाले, त्यावेळी एक प्रश्न भेडसावत होता : हा नवा भारत देश कुठल्या प्रकारचे राज्य असेल? या प्रश्नाचं उत्तर हवं असेल, तर या पुस्तकाचं एकेक पान चाळत जा म्हणजे गेल्या सत्तर वर्षांतला झंझावाती प्रवास तुमच्या नजरेस पडेल.

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक उपलब्ध**

# संवाद परमेश्वराशी

*भाग ३*




**नील डोनाल्ड वॉल्श**

**अनुवाद : डॉ. वृषाली पटवर्धन**

'देवानं तुम्हाला निर्माण केलंय, असंच कायम तुम्हाला सांगितलं गेलं आहे. आता मी तुम्हाला सांगतो 'तुम्ही देव निर्माण करताय!' माझ्या मनात जेव्हा हे शब्द उमटले आणि या संहितेत ते उतरवले, तेव्हाच ते आध्यात्मिक क्षेत्रात खळबळ उडवून देणार, क्रांती करणार हे मला ठाऊक होतं.

**किंमत : ४२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक उपलब्ध**

# पुस्तक परिचय



# उत्तरकांड

**(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**

सीतेचा अनुभव आणि चिंतनाच्या दृष्टीनं मांडलेली रामकथा

## डॉ. एस्. एल्. भैरप्पा

अनुवाद

### उमा वि. कुलकर्णी

एकाएकी रामाचा प्रचंड संताप आला. मला महर्षींच्या आश्रमाच्या मुख्य दारापाशी सोडून यायची राजाज्ञा केली. म्हणजे महर्षींवर जबाबदारी टाकून मोकळा झाला. त्याप्रमाणे ते माझ्या पोटापाण्याचं बघतीलही; पण 'परित्यक्ता' या बिरुदापासून ते तरी कसं माझं रक्षण करू शकतील? आपल्या मुलांना बघायला तरी कधी तो आला का? प्रसव झाल्याच्या दहाव्या दिवशी बाळंतिणीनं बाळाला पतीच्या कुशीत झोपवायचं, त्यानं त्याची टाळू हुंगून आपल्या पितृत्वाची हमी द्यायची; बाळाला एक नाव प्रदान करायची एक रीत. नव्हे, हे तर बाप म्हणवणाऱ्याचं कर्तव्य! त्यासाठीही हा नाही आला! म्हणजे माझ्याबरोबर आपल्या मुलांचाही त्यानं त्याग केलाय. तरीही याला धर्मनिष्ठ म्हणायचं? हा कसला धर्मराजा? माझ्या मुलांना नाव दिलं ते महर्षींनी! वेडा आहेस तू रामा... धर्माचं मद्य प्राशन केलेला मद्यपी!

जिवाचा संताप संताप होतो. माझ्या सगळ्या दु:खाला आणि माझ्या लेकरांच्या अनाथ अवस्थेला कारणीभूत असलेल्या त्या रामाविषयी आणखी कुठली भावना असणं शक्य आहे? शाप द्यायची अनावर इच्छा होते! प्रत्यक्षात व्यभिचार केलेल्या अहल्येच्या पश्चात्तापाचं कारण पुढं करून वयाच्या अठराव्या वर्षी तिच्या पतीच्या मनात दया निर्माण करणाऱ्या या करुणाळूला मनातही चूक न केलेल्या पत्नीला अशा प्रकारे शिक्षा करण्याची

अधर्माची कठोर भावना पस्तिशीत कशी आली? चुकीच्या मार्गानं जाणाऱ्या प्रजेला शिक्षा करून मार्गावर न आणणारा हा कसला राजा? हा एक करुणाळू व्यक्ती आहे, म्हणूनच मी तेव्हा कातरतेनं याची वाट पाहिली ना!




एवढंच कशाला! लग्नानंतरही याच्या वागण्यात करुणा हेच मूलद्रव्य होतं. माझी याच्याकडून अपेक्षाही तेवढीच होती ना! शाप द्यावा इतका संताप होतो जिवाचा; पण माझ्या शापात काही शक्ती आहे का?

'शाप म्हणजे कोप! मनात कधीही कोपाला थारा देता कामा नये!' हे बाबांचं सततचं सांगणं होतं. हे त्यांचं सांगणं मनात खोलवर रुतून बसलं नसतं, तर इतक्या वर्षांत माझ्या तोंडून किती वेळा शापाचा उच्चार झाला असता कोण जाणे! बाबा, माझं चुकलं! नवऱ्याला शाप देणारी मुलगी नाही मी! तुमच्या जावयाचं काय चूक आणि काय बरोबर हे तोलून पाहायची शक्ती फक्त तुमचीच आहे. संकटात सापडलेल्या माझ्याकडे ती शक्ती कदापि नाही.मी कधीच तुम्हाला आणि तुमच्या वंशाला वाईट नाव येईल असं वागणार नाही.

हा विचार मनात आला की मनातलं दु:ख थोडं कमी होतं.

गेल्या दोन खेपांप्रमाणे ऊर्मी आली. विशेष अलंकार केले नसले, तरी प्रवासाच्या दणकट रथात बसून तीन वर्षांच्या अंगदालाही सोबत घेऊन आली. अंगद गेल्या वर्षी आल्याचं पार विसरून गेला होता. पण अडीच वर्षांच्या दोन्ही धाकट्या भावांबरोबर त्यानं पट्कन मैत्री करून घेतली. अगदी लव-कुशासारखा दिसत नसला, तरी भावंडं म्हणून ओळखता येईल, इतकं त्या तिघांत साम्य होतं. थोडा मोठा असल्यामुळे खोडकरपणातही तो थोडा वरचढच होता! चेहरा आणि शरीराची चण लक्ष्मणाचं नातं सांगत होती. आता ऊर्मीही थोडी स्थूल होऊ पाहत होती.

बोलता-बोलता म्हणाली, ''पाचवा महिना चाललाय!''

माझ्या मनात आनंद भरला. गर्भारशी! इथं असेपर्यंत तिचे सगळे डोहाळे पुरवायला पाहिजेत... तिची ओटी भरून पाठवायला पाहिजे... माझे मनसुब सुरू झाले.

याही खेपेला तिनं दोन गाड्या भरून धान्य आणि इतर सगळं सामान

आणलं होतं. ते पाहून एकीकडे आनंद झाला तरी दुसरीकडे संकोचही वाटला. ही  माझी धाकटी बहीण आणि धाकटी जाऊ! पण तरीही दर वर्षी न चुकता तीच माझी काळजी घेते! तिनं आणलेल्या या सामानामुळे मी या आश्रमात मानानं राहू शकते.

मी संकोचानं म्हटलं, ''गेल्या वर्षीचंच अजून शिल्लक आहे. पुन्हा का आणलंस?''

''वेगळ्या जातीचं भात आहे! इतरही धान्य वेगवेगळ्या प्रकारचं आहे. खाऊन तर बघ तुझ्या दिराचं कृषिकौशल्य!''


''पण तो का आला नाही?'' नकळत माझ्या तोंडून आलं. तो येणार नाही हे ठाऊक असूनही! कदाचित तो यावा, अशी मनोमन इच्छा अशी व्यक्त झाली असावी. का नाही आला, त्याची निराशा? मनातली ही चलबिचल केवळ मलाच ठाऊक होती.

''अगं, आठ कोसांवरच्या एका गावात एक तलाव बांधण्यात गुंतलाय तो! दररोज सकाळी उठल्याउठल्या तिकडंच जातो. भोवतालच्या चार-पाच खेड्यांतल्या माणसांना कामावर घेतलंय. हा गेला नाही, तर त्यांतली काही माणसं चुकारपणा करतात! पाऊस सुरू व्हायच्या आधी ते संपवायचंयम्हणत  होता.''

ही लक्ष्मणाची कार्यनिष्ठा, कृषी प्रयोग करायची आवड माझ्यापेक्षा आणखी कुणाला ठाऊक असणार आहे! रानटी धान्याचा बी म्हणून वापर करायचा, वन्य प्राण्याच्या विष्ठेचा खत म्हणून वापर करायचा, असं पीक आलं की दगडावर वरवंट्यानं रगडून त्याचं पीठ करायचं, ते शिजवून खायचं! त्यानं एवढा सगळा उपद्व्याप केला नसता, तर केवळ कंदमुळं खाऊन पोट भरलं असतं का? खाल्लेलं अंगी लागलं असतं का? शरीर काटक राहिलं असतं का? झाडंझुडपं कुऱ्हाडीनं तोडून त्या लाकडांची दणकट झोपडी बांधली नसती तर वन्य प्राण्यांपासून रक्षण झालं असतं का? लक्ष्मणा, तू कार्यकुशल आहेस यात शंका नाही! जीवनोपयोगी आहेस; तुझ्या दादासारखा नाहीस! माझ्या मनात मौन संवाद चालला होता. तलावाच्या बांधकामाची घाईही खरी असेल. कदाचित ते खोटं कारणही असेल. कोण जाणे!

◆

## नवं कोरं




### हेल्थ मेटर्स


**डॉ. नंदकुमार उकडगावकर**

सत्य आठवणी व काल्पनिक प्रसंग यांना विनोदाचा मसाला लावून द्वैअर्थी शब्दांची फोडणी देऊन लिहिलेले हे अठरा लेख! शाब्दिक कोट्या हा त्यांचा गाभा! माझे मित्र व शिक्षक यांच्यामुळे माझ्या वाट्याला 'रम्य ते बालपण' आलं. महाविद्यालयात शिकताना व निवासी डॉक्टर म्हणून काम करताना आलेल्या गमतीदार प्रसंगांनी माझ्या जीवनात वेगळीच खुमारी आणली आहे. 'विचार बदला, जग बदलेल' या उक्तीची प्रचिती देणारा लेखसंग्रह...

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

### नाकोहस

**पुरुषोत्तम अग्रवाल**
**अनुवाद : सुनीता देवस्थळी**




राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि बऱ्याच बाबतीत दूषित झालेल्या वातावरणात तत्त्वानं वागणारे, बुद्धीच्या कसावर जग पारखणारे, खऱ्या अर्थानं प्रामाणिकपणे जगू पाहणारे, आपल्यासारख्या निधर्मी देशात निर्मळ मनानं, खरोखरीच धर्मसहिष्णुतेनं राहू पाहणारे मात्र या भरडले जातात... हे वास्तव सुकेत, रघू आणि शम्स या तीन भिन्न धर्मांच्या तरीही वैचारिक साम्य असलेल्या बुद्धिजीवी मित्रांच्या माध्यमातून पुरुषोत्तम अग्रवाल यांनी अधोरेखित केलं आहे 'नाकोहस' या व्यंगात्मक कादंबरीतून.

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक उपलब्ध**

# पुस्तक परिचय



## प्रतिश्रुती
### स्मरणयात्रा भीष्मांची

**(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**

अश्रू हरवलेल्या महान व्यक्तीची कथा

**ध्रुव भट्ट**

अनुवाद

**अंजनी नरवणे**


जयंतग्राममध्ये जे काही घडलं, ते नशिबानं– दैवयोगानं झालं, असं म्हटलं गेलं; परंतु ते सर्व माणसांनी स्वत: नक्की बेत करून ठरवलेलं, स्वत: घडवून आणलेलं, असंच होतं. त्यात दैवाचा किंवा विधात्याचा काही भाग नव्हता. मी तर येथपर्यंत जाऊन म्हणेन की सर्व घडलं तेवढ्या काळात आम्ही मुळी माणसंही राहिलो नव्हतो!

तेथे मला फक्त तीनजणंच 'माणूस' म्हणण्यासारखी दिसत होती– एक तर खुद्द द्रौपदी, जी जिवावर उदार होऊन दुष्टांचा प्रतिकार करत राहिली होती. दुसरा गांधारीपुत्रांपैकी लहान कौरव विकर्ण, जो कोणाचीही भीती न बाळगता, त्याला जे खरं-बरोबर वाटत होतं, ते बोलला होता. आणि तिसरी होती गांधारी– अंध राजांजवळ बसलेली त्यांची पत्नी– जिनं तिच्या स्वत:च्या सख्ख्या पण जुलमी मुलाला तिथल्या तिथे मारून टाका असा सल्ला दिला होता.

आणि मी?– वसूंचा अंश आणि महान समजला जाणारा भीष्म, त्या वेळी गप्प बसलो होतो– आणि जेव्हा बोललो तेव्हाही काहीच स्पष्ट, निर्णयात्मक बोललो नव्हतो!

अरेरे! कृष्ण, का म्हणून तुम्ही मला त्रास देत आहात? का म्हणून मला

सर्व भूतकाळ आठवून बघायला सांगून गेलात? आज आता अर्ध्या रात्री, चित्रा आणि स्वाती नक्षत्रं क्षितिजावरून वर येऊन आकाशात पुढे जात आहेत, तेव्हा मी जागा राहून हे सर्व पुन्हा घडावं, तसा बघत आहे– आम्ही जयंतग्रामला पोहोचलो. तो पाहा युधिष्ठिर– सर्वांना जवळ घेऊन भेटला. धृतराष्ट्राच्या पाया पडला. इकडे पाहा– पांडव आले म्हणून धृतराष्ट्राचा आनंद उतू चाललाय!




दुसऱ्या दिवशी सकाळी शकुनी आम्हाला घेऊन जायला आला. तो द्यूताच्या खेळाबद्दल, त्यात येणाऱ्या मजेबद्दल, त्यात जिंकण्याची जी शक्यता असते त्याबद्दल बरंच काही बोलला. युधिष्ठिरानं जुगाराचा बेत रहित करावा, यासाठी शेवटचा प्रयत्न करत शकुनीला म्हटलं–

''निकृतिर्देवनं पापं न क्षात्रोत्र पराक्रमः।
न च धीतिर्धुवा राजन् किं त्वं द्यूतम् प्रशंससि।।''

(राजा, जुगार तर एक प्रकारची लबाडी आणि पाप आहे. त्यात क्षत्रियांना शोभणारा पराक्रम नाही, आणि त्याचे काही नक्की नियमही नसतात. तरीही तुम्ही जुगाराची प्रशंसा का करत आहात?)

''न हि मानं प्रशंसन्ति निकृतो कितवस्य हि।
शकुने मैवनो जैषिरमार्गेण नृशंषवत्।।''

(शकुनी, जुगाऱ्यांची प्रतिष्ठा लबाडीतच असते. सज्जन अशा प्रतिष्ठेला मान देत नाहीत. तुम्ही लबाड आणि दुष्ट माणसांसारखं चुकीच्या मार्गानं आम्हाला जिंकण्याचा प्रयत्न करू नका.)

शकुनी निर्लज्जासारखा म्हणाला, ''फासे कसे टाकायचे हे ज्याला समजतं, त्याच्यासाठी लबाडीचा प्रतिकार करणं सोपं असतं. शिवाय, जय-पराजय तर फासे कसे पडतात त्यावर अवलंबून आहे आणि फासे पडणं तर दैवाच्या आधीन आहे. तरी पण इथपर्यंत आल्यावर तुम्हाला भीती वाटत असेल, की तुम्हाला दगा देण्यात येईल, तर ठीक– सभेत या, आणि सर्वांना सांगून खेळातून बाहेर पडा!''

बिचारा युधिष्ठिर! त्याला खेळायचंही नव्हतं आणि खेळातून बाहेरही पडायचं नव्हतं. त्याची इच्छा होती की हे सगळं आपोआप थांबावं; पण तसं होणार नव्हतं. पांढऱ्या गादीवर अंथरलेल्या द्यूताच्या रंगीत पटासमोर तो

त्याच्या भावांबरोबर जाऊन बसला. शकुनीचा विजय होणार हे तर नक्कीच होतं! युधिष्ठिर हरत गेला. धन, सोनं, सैन्य, भूमी, पशुधन कोण जाणे काय काय! त्याच्याकडे काहीच राहिलं नाही तेव्हा त्यानं नकुलला पणाला लावलं– मग सहदेव, अर्जुन आणि भीम आणि शेवटी स्वत:लाही पणाला लावून हरला! शेवटी तो म्हणाला, ''आता माझ्याकडे काहीच नाही. मला जाऊ द्या.''

मी धृतराष्ट्राकडे बघितलं. आम्हाला सगळ्यांना वाटत होतं, की आता धृतराष्ट्र हा खेळ संपला असं जाहीर करेल; पण तो तर अजूनही गप्पच बसून राहिला. त्याला परिस्थितीचं गांभीर्य दिसत तर नव्हतंच, पण समजतही नव्हतं.

मी माझ्या राजाला आज्ञा करू शकत नव्हतो, तरीही सल्ला देत सांगितलं, ''महाराज, द्यूत गंमत म्हणून खेळलं, तरीही तो अध:पतनाचा मार्ग आहे. त्यातही आजचा खेळ तर गुप्तचर्चा करून, दुष्ट उपाय सांगून, तुमच्या मनाला पटवून दिला गेला आहे,'' मग मी बाकीच्या कुरूंना म्हणालो, ''शंतनूच्या वंशजांनो, कौरवांच्या सभेत सांगतो आहे, ते माझं सांगणं लक्ष देऊन ऐका. मूर्ख दुर्योधनाच्या मागे जाऊन तुम्ही सर्व वैराच्या आगीत उड्या मारू नका!''

धृतराष्ट्राला जरा आधार मिळाला, तेव्हा तो जरा सावरला. आता तो बोलेल म्हणून सर्व वाट बघत होते. राजा काही बोलणार एवढ्यात दुर्योधन मला म्हणाला, ''पितामह, आपण कर्ताधर्ता आहात असं समजू नका. रोज रोज आमच्यावर टीका करणं सोडून द्या. माझ्या हिताच्या बाबतीत मी कोणाचा सल्ला विचारत नाही आणि कोणाचा सल्ला ऐकत नाही. आम्हाला तुम्ही दोष देत राहता, ते आम्ही ऐकून घेतो, हेच खूप आहे.''

खेळ बंद करण्याबद्दल बोलणं पुढे चालू होण्याआधीच शकुनी युधिष्ठिराला म्हणाला,

''अस्तिते वै प्रिया राजन् ग्लह एकोऽपराजित:।
पण स्वं कृष्णां पांचालीं तया आत्मानं पुनर्जय।।''

(राजा, आपली प्रियतमा द्रौपदी एक असा डाव आहे, की तो तुम्ही अजून हारलेला नाही! म्हणून पांचालकुमारी कृष्णाला पणाला लावा, आणि जिंका, तुम्हालाही सोडवून घ्या.)


◆

# महात्मा गांधी

आणि त्यांचा भारतीय संघर्ष

**जोसेफ लेलिव्हेल्ड**

अनुवाद : **मुक्ता देशपांडे**





'राष्ट्रपिता' महात्मा गांधींनी पाहिलेली मोठ्या कार्याची स्वप्ने, सामाजिक मूल्यांचे त्यांना असलेले भान आणि अहिंसक प्रतिरोधाचे त्यांचे तत्त्वज्ञान दक्षिण आफ्रिकेत घालविलेल्या दोन दशकांत कसे फुलले व पोसले गेले आणि त्यांना 'महात्मा' म्हणून डोक्यावर घेणाऱ्या भारताने सामाजिक उत्क्रांतीच्या ध्येयमार्गावर थोडी वाटचाल करून, त्यांची परीक्षा कशी घेतली याचे काळजाचा ठाव घेणारे वर्णन जोसेफ लेलिव्हेल्ड यांनी सुस्पष्ट आणि अभूतपूर्व बारकाव्यांनिशी केले आहे.

**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

# प्रतिभेचा इंद्रधनू

**जोना लेहरर । अनुवाद : डॉ. अजेय हर्डीकर**




'सर्जनशीलता म्हणजे मूठभर लोकांमध्ये आढळणारी दैवी शक्ती' असते, असं सर्वसाधारणपणे म्हटलं जातं; पण सर्जनशीलतेचा वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही अभ्यास केला जोना लेहरर यांनी. विविध दृष्टिकोनांतून या अभ्यासाची त्यांनी मांडणी केली. सुबक वैज्ञानिक प्रयोग आणि अभ्यासांचे दाखले ते देतात. न्यूरॉन ते घासूनपुसून तयार झालेली सिम्फनी आणि मेंदूतलं सर्किट ते एखादं यशस्वी प्रॉडक्ट यादरम्यान असलेले असंख्य पदर उलगडून दाखवणारं अनोखं पुस्तक.

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**



# अशी माणसे येती

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

साहित्य क्षेत्रावर अचाट प्रभुत्व असणाऱ्या,
वसंत जोशी यांना भेटलेल्या व्यासंगी व्यक्तिमत्त्वांचे जीवनसार...


## डॉ. वसंत जोशी

### शंकर पाटील - काही स्मृती

शंकर पाटील गेले... मृत्यूशी झगडत; काहीशा निराश अवस्थेत त्यांनी या जगाचा निरोप घेतला. एक उत्कृष्ट कथाकार, कादंबरीकार, पटकथा-संवाद लेखक, वक्ता काळाच्या पडद्याआड गेला. ज्याचा जन्म मातेनंही नाकारला होता; अशा या पाटलाच्या पोरानं स्वत:च्या कर्तृत्वानं आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण केली आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदापर्यंत यशस्वी वाटचाल केली. नवकथाकारांच्या 'चौकटी'त त्यांचा समावेश नसला तरी ग्रामीण कथाकार म्हणून त्यांच्या पंक्तीला बसण्याइतकं स्थान त्यांनी निश्चितच मिळवलं होतं.

मराठी ग्रामीण कथेला एक कलात्मक आणि दर्जेदार उंची त्यांनी प्राप्त करून दिली. त्यांचा पिंड मराठी आणि इंग्रजी साहित्याच्या चिंतन, मननावर परिपूर्ण झाला होता; त्यामुळे त्यांच्या कथांना तत्त्वचिंतनाची बैठक लाभली होती. 'धिंड' किंवा 'ताजमहालात सरपंच' यांसारख्या त्यांच्या गाजलेल्या कथांचा बाज विनोदी ढंगांचा असला तरी ग्रामीण जीवनातील बदलत्या प्रवाहांचे बारकावेही त्यांत प्रकट झालेले आहेत. 'वेणी'सारख्या त्यांच्या कथांतून केवळ ग्रामीणच नव्हे तर व्यापक स्त्रीजीवनाच्या व्यथा-वेदनांना

भिडण्याची त्यांची ताकद स्पष्ट झाली. वाई महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते आले होते, त्यावेळी त्यांचा परिचय करून देताना मी म्हटलं होतं, 'एका खेडेगावच्या पाटलानं हाती नांगर धरून उसाचा मळा पिकवायचा; पण शंकर पाटलांनी लेखणी हाती धरली आणि साहित्याचा सदाहरित मळा फुलवला.'




शंकर पाटलांचा आणि माझा तसा परिचय असला तरी आम्ही अधिक जवळ आलो ते पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळावर आम्हा दोघांचीही निवड झाल्यानंतर १९८५ मध्ये. त्यानंतर आमच्या गाठीभेटी वाढल्या. एकत्र प्रवास अन् काही वेळा पत्रव्यवहारही झाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती आणि 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'चा संपादक म्हणून मी निवडून आलो होतो. योगायोगाची गोष्ट अशी की, त्याच वेळी त्यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नांदेड येथील अधिवेशनाच्या अध्यक्षपदी निवड झाली होती; त्यामुळे 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'च्या माझ्या संपादनाखालील पहिल्याच अंकात त्यांच्याविषयीच्या लेखांवर अधिक भर होता. द. मा. मिरासदार, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. विजया राजाध्यक्ष, पुरुषोत्तम पाटील यांचे शंकर पाटील यांचं व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मय याविषयीचे लेख त्यात प्रसिद्ध झाले आहेत.

त्यानंतरचा 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'चा दिवाळी अंकही 'कथा विशेषांक' म्हणून प्रसिद्ध केला. त्यावेळी माझ्या विनंतीवरून त्यांनी मुद्दाम 'बंधारा' ही कथा लिहून माझ्या स्वाधीन केली. पुढे नांदेडच्या संमेलनास आम्ही गेलो. शंकर पाटलांचं ते भाषण साहित्यविषयक चिंतन आणि अनुभव यांतून स्फुरलेलं होतं. त्यावेळी ते म्हणाले होते, 'लेखन हाच लेखकाचा श्वास बनला पाहिजे. त्याच धुंदीत आपण सदैव असलं पाहिजे. मग अनुभवांचा तुटवडा भासत नाही. तंबोऱ्याच्या तारा जुळवून ठेवलेल्या असल्या म्हणजे लहानशा स्पर्शानं देखील त्यातून सप्तकार निघतो. लेखक, कलावंतांच्या अनुभवाचं असंच आहे. त्याच्या जाणिवेच्या तारा जुळलेल्या असल्या की, एखाद्या लहानशा प्रसंगानं किंवा एखाद्याच्या तोंडच्या

वाक्यानंही अनुभव स्वरूप घेऊ लागतो; स्पंदनं जाणवू लागतात. त्यासाठी कलावंत म्हणून आपलं व्यक्तिमत्त्व आपण किती संपन्न करतो, त्यावरही ही क्षमता थोडीफार अवलंबून असते.'

नांदेडच्या या संमेलनात अध्यक्षीय भाषण करण्यास ते उभे राहिले. समोर प्रचंड श्रोतृवर्ग होता. एवढ्यात एका गृहस्थाने मध्येच उभा राहून प्रश्न विचारला, 'कथा अकलेच्या कांद्याची हे वगनाट्य मुळात श्री. साठे यांचं असताना तुम्ही लेखक म्हणून स्वत:चं नाव का घालता?' श्री. शंकर पाटील शांतपणे तो प्रश्न ऐकत होते. श्रोते या अचानक प्रश्नामुळे स्तंभित झाले होते; पण पाटील खंबीरपणे उत्तर देताना म्हणाले, ''होय, ती कथा मूळची श्री. साठे यांचीच आहे; मी फक्त त्याचे संवाद लिहिले आहेत. जाहिरातीत तसा उल्लेखही आहे. तो जरा काळजीपूर्वक वाचा.'' असं ठणकावून सांगून ते आपल्या मूळ विषयाकडे वळले.

संमेलनाला आलेल्या प्रतिनिधींची ते अगत्यानं चौकशी करत. भोजन मंडपामध्ये भोजन करणाऱ्या प्रतिनिधींपुढे जाऊन 'भोजन कसं आहे?' असं विचारत. त्यांच्या सोबत स्वागताध्यक्ष श्री. शामराव कदम हेही होते. ते माझ्यासमोर आले, त्यावेळी त्यांचेच शब्द वापरून मी त्यांना म्हणालो, ''शंकरराव, तुमचं भाषण आणि आताचं हे जेवण एकदम 'जंक्शन' झालं.'' हे ऐकताच ते आणि श्री. शामराव कदम दोघंही खळखळून हसले.

त्यानंतर दि. ६ आणि ८ फेब्रुवारी, १९८८ रोजी सावंतवाडी येथे भरलेल्या 'लेखक मेळाव्या'साठी आम्ही एकत्र गेलो. सोबत श्री. राजेंद्र बनहट्टी, राजा फडणीस, म. म. कुलकर्णी, डॉ. गं. ना. जोगळेकर हेही होते. सकाळी ८ वाजता आम्ही पुण्यात श्री. शंकर पाटील यांच्या घरी जमलो. लीलावहिनींनी सर्वांना भरपूर अल्पोपाहार दिला आणि आम्ही मेटॅडोर गाडीतून निघालो. कोकण रत्नागिरी साहित्य संघ आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वतीने हा मेळावा भरला होता. कार्यकारिणीचे एक सदस्य आणि प्रसिद्ध कवी डॉ. वसंत सावंत संयोजक होते. पंचम खेमराज महाविद्यालयात 'विद्यार्थी सदना'च्या सभागृहात हे कार्यक्रम झाले. मेळाव्याचं उद्घाटन आणि रात्री शंकर पाटलांच्या कथाकथनाचा शानदार कार्यक्रम झाला. दुसऱ्या दिवशी 'कवी संमेलन', 'साहित्य आणि व्याकरण' या विषयावर परिसंवाद झाला; नंतर 'साहित्यिक गप्पा' असे कार्यक्रम झाले. या निमित्तानं एक छोटं साहित्य संमेलन झाल्याचा आनंद सावंतवाडीकरांना

झाला.

आम्ही त्याच दिवशी सायंकाळी परत निघालो; पण कणकवलीच्या अलीकडे गाडी बंद पडली. शंकर पाटलांनी नेमका दोष सांगितला. ड्रायव्हर कणकवलीस गेला आणि तात्पुरती व्यवस्था करून त्यानं गाडी कणकवलीपर्यंत नेली. त्या रात्री आम्हाला कणकवलीत मुक्काम करावा लागला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही कणकवलीहून निघालो. घाट चढून गाडी सपाटीवर आली आणि गाडीच्या एअरकंडिशनिंगच्या वायरमधून हळूहळू धूर येऊ लागला. गाडी थांबवून आपआपले सामान घेऊन आम्ही भराभरा खाली उतरलो आणि दूरवर थांबलो. गाडी धुरानं पूर्ण भरून गेली होती. एवढ्यात घाटातून एक ट्रक वर आला. सगळीकडे धूर पाहून ट्रकचा ड्रायव्हर आणि त्याच्या बरोबरचे लोक खाली उतरले. त्यांनी प्रथम वायर तोडून टाकला, धूर कमी होत गेला; हवी ती दुरुस्ती झाली. आम्ही धास्तावलेले, बाजूस उभे होतो. शंकर पाटील मिस्कीलपणे आमची अवस्था पाहत होते. गाडीत पुन्हा बसताना ते आपल्या विशिष्ट स्टाइलमध्ये म्हणाले, 'अवो, यंतारच म्हटल्याल हाय हे. कवातरी असं हुणारच!' यावर ते आणि आम्ही सगळेच हसलो. मनावरचा ताण दूर झाला होता.

प्रसिद्ध साहित्यिक श्री. म. माटे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'चा 'श्री. म. माटे जन्मशताब्दी विशेषांक' प्रसिद्ध केला. या अंकासाठी लेखन करण्याची विनंती मी शंकर पाटलांना पत्रानं केली. त्याच्या उत्तरात शंकर पाटलांनी म्हटलं होतं, 'तुम्हा प्राध्यापकांना टिपणे काढण्याची आणि हुकमी लेखनाची सवय असते. माझ्याकडे असं साहित्य हाताशी उपलब्ध नाही' असं सांगून त्यांनी आपली असमर्थता व्यक्त केली होती. मला आलेलं त्यांचं हे पहिलं पत्र. दुसरं पत्र ठीक एक वर्षापूर्वीचं आहे. त्यावेळी 'दूरदर्शन'वर त्यांच्या कथांवर आधारित 'प्रतिबिंब' ही मालिका सुरू होती.

पहिली कथा 'बंधारा' ही होती आणि ती त्यांनी माझ्या विनंतीवरून 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'साठी लिहिली होती. ती दूरदर्शनवर सादर झाल्यानंतर मी शंकर पाटलांना एक पत्र लिहिलं. दि. १९ ऑगस्ट, १९९३ रोजी त्यांनी माझ्या पत्राचं उत्तर पाठवलं. कथालेखक म्हणून त्यांची त्यातील प्रतिक्रिया बोलकी आहे. आपल्या पत्रात ते म्हणतात–

शंकर पाटील
'सिंधू', पत्रकारनगर, पुणे ४११०५३.

प्रिय श्री. वसंतराव यांस,

सप्रेम नमस्कार,

आपले दि. २८ जुलै, १९९३ चे पत्र मिळाले. दूरदर्शनवर दाखविण्यात आलेल्या 'प्रतिबिंब' या मालिकेतील 'बंधारा' ही कथा आम्ही सर्वांनी पाहिली. तुम्हाला ती परिणामकारक वाटली, याचा थोडा आनंद वाटतो; पण खरे म्हणाल तर विषादच अधिक वाटला. ग्रामीण कथांचे असे-तसे चित्रीकरण मुंबईतल्या कलाकारांना जमत नाही आणि जे करतात ते स्टुडी ग्रामीण असते. मुळातला नैसर्गिक गोडवा त्यात राहत नाही. आपल्याला जे आवडले असेल ते कथेतच मुळात ताकद असल्यामुळे! चित्रीकरणामुळे जे आणखी पैलू पडायला पाहिजेत तसे काही चिन्ह मला जाणवेना. म्हणून ते लिखाण मी तूर्त तरी बंदच केले आहे. थोड्या वेळात कथा, कशीनशी करणे म्हणजे जुन्या कपड्यांचे गाठोडे बांधण्यासारखे वाटते. असे करण्यापेक्षा आणि मन मारून तडजोड स्वीकारण्यापेक्षा न लिहिलेले काय वाईट? आपल्या मनाला क्लेश तर होत नाहीत. आपल्या पत्राने आनंद वाटला. लोभ आहेच; वृद्धी व्हावी.


स्नेहांकित,
शंकर पाटील

जीवनातील भेदक वास्तव आणि मनुष्याची नियती यांचं मार्मिक चित्रण त्यांच्या 'बंधारा' या कथेत झालं आहे. शंकर पाटील आता अधिकाधिक अंतर्मुख होत चालले होते आणि एकूणच विश्वाच्या या पसाऱ्यात मनुष्याच्या अहंकारी अस्तित्वाला काही अर्थ नाही, हे त्यांना जाणवू लागलं होतं. कौटुंबिक जीवनातही ते खंतावले होते. त्यांचा मुलगा काविळीचं निमित्त होऊन अलीकडंच देवाघरी गेला होता. त्यांच्यावर हा मोठा आघात होता. शारीरिक व्याधींनी त्यांचं शरीर पोखरून निघालं होतं आणि शेवटी अटळ ते घडलं होतं.

◆

## तहमिमा अनम लिखित दोन नवीन पुस्तके

# आहे कट्टर तरी...




अनुवाद : **भारती पांडे**

धार्मिक मूलतत्त्ववाद शिगेला पोहोचल्याच्या काळामध्ये बांगलादेशात ही कथा घडते. सोहेलला भेटलेल्या एका तरुण स्त्रीची कहाणी त्याला आयुष्यभर छळत राहते. जवळ जवळ एका दशकाच्या गैरहजेरीनंतर त्याची बहीण माया घरी परत येते. तिला तिचा लाडका भाऊ पार बदलून गेलेला आढळतो. माया अजूनही तिच्या क्रांतिकारक आदर्शांशी बांधलेली आहे तर सोहेलनं आपलं पूर्वीचं आयुष्य साफ सोडून दिलं आहे आणि आता तो एक कट्टर असा धार्मिक नेता बनलेला आहे. 'द गुड मुस्लीम' ही कादंबरी श्रद्धा, कुटुंब आणि युद्धाची गडद सावली याविषयी बोलते.

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

# झुबेदा




अनुवाद : **सरिता आठवले**

आत्मशोधासाठी तळमळणाऱ्या झुबेदाची कथा.

ही कथा तिने आपल्या प्रियकराला, एलिजाला सांगितली आहे. या आत्मशोधाच्या साखळीतला दुवा 'अन्वर'. ही कहाणी अन्वरचीही आहे.

या कहाणीत एक व्हेल, एक जहाज, एक पियानो आणि एक हरवून गेलेला मुलगा हेही गुंतले आहेत. उत्कट प्रेमाची ही अनवट कहाणी आहे.

**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

# पुस्तक परिचय



TBC-28
Book No. 5

# क्युअर

एका शवविच्छेदनापासून सुरू होतो एक थरार... जो अखेरच्या पानापर्यंत श्वास रोखून धरायला भाग पाडतो... उत्कंठावर्धक वैद्यकीय थरारनाट्य...

**रॉबिन कुक**

अनुवाद

**अनिल काळे**


मार्च २७, २०१०

शनिवार, सकाळी ९.१६

जॅक आणि लॉरी, दोघांचीही ती रात्र भयंकर अवस्थेत गेली होती. पोलिसांनी फोन टॅप करण्यासाठी बसवलेली उपकरणं सांभाळणारा एकमेव पोलीस अधिकारी सोडता– आणि हा माणूसही एका छोट्या खोलीतच होता– बाकीचे लोक निघून गेल्यावर जॅक आणि लॉरीला ते रिकामं घर जणू खायला उठलं होतं. त्यातच नेहमी सगळ्या घराचा केंद्रबिंदू बनून राहणारा जेजेसुद्धा नव्हता. आपलं बाळ त्या गुंडांच्या ताब्यात आहे, ते त्याचे हाल तर करत नसतील ना, तो ठीक असेल ना, अशा असंख्य विचारांनी त्यांना पार बेचैन करून सोडलं होतं. आणि त्याच्यासाठी काहीही करण्याच्या परिस्थितीत आपण नाही, ही अगतिकतेची भावना तर त्यांना छळत होती. जेजेच्या जीवघेण्या आजारपणातसुद्धा त्यांना इतका त्रास झाला नव्हता. मधूनच लेटिशिया, तिच्या नाहक हत्येचा विषय निघायचा. तिच्या मृत्यूला आपण जबाबदार असल्याची भावना तर त्या दोघांना जन्मभर छळणार

होती.

एक वेळ अशी आली, की लॉरी रडूनरडून थकून झोपी गेली होती; पण जॅकला मात्र अजिबातच झोप लागली नव्हती. शेवटी सकाळचे साडेसात वाजले तसं उठून त्यानं तोंडावर पाणी मारलं होतं, आणि स्वत:साठी एक चहाचा पॉट बनवून तो मुख्य हॉलमध्ये येऊन बसला होता. विचार करकरून त्याचं डोकं सुन्न झालं होतं. मेंदूनं जणू संप पुकारला होता.




बराच वेळ असाच गेला होता.

आणि अचानक फोन वाजू लागला. गडबडून जाऊन जॅकनं तो पटकन उचलला, कारण लॉरीला त्या आवाजानं जाग येऊ द्यायची नव्हती त्याला.

''हॅलो.'' त्यानं कसंबसं म्हटलं.

''मला लॉरी मॉंटगोमरी-स्टेपल्टनशी बोलायचं आहे.'' पलीकडून ब्रेननचा आवाज आला– तो मुद्दाम चिडलेल्या आवाजात बोलायचा प्रयत्न करत होता.

''त्या अजून झोपल्या आहेत.'' जॅकनं म्हटलं. त्यानं जरी हा आवाज प्रथमच ऐकलेला असला, तरी कोण बोलत असेल हे त्यानं क्षणार्धात ताडलं. त्याच क्षणी त्याच्या मनात संतापाची, चिडीची एक भयंकर लाट उसळली; पण त्यानं मोठ्या प्रयत्नानं स्वतःवर ताबा मिळवला.

''मग उठवा त्यांना. त्यांच्या मुलाबद्दल फोन आलाय असं सांगा, म्हणजे खडबडून जाग्या होतील त्या.''

''तू माझ्याशी बोल.'' जॅक थेट एकेरीवर उतरला, ''मी त्या मुलाचा बाप आहे आणि तिचा नवरा आहे.''

''मला फक्त तिच्याशीच बोलायचंय. तुझ्याशी नाही.'' ब्रेननंही एकेरीवर येत ठासून म्हटलं, ''आणि फुकट वादविवाद घालत बसू नकोस, नाहीतर मी गाडीतून त्या कार्ट्याला इथे खेचून आणेन आणि मग जे करीन, त्यानं पस्तवाल तुम्ही दोघं.''

''ओके.'' जॅकनं मोठ्या नाइलाजानं म्हटलं. त्याला काहीही झालं, तरी जेजेला काही होऊ द्यायचं नव्हतं. फोन शेजारच्या टेबलावर ठेवून तो चटकन बेडरूमकडे गेला. त्यानं दार उघडलं, तेव्हा लॉरी उठून बसलेली होती. तिनं दोन्ही हातांनी चेहरा झाकून घेतलेला होता.

''सॉरी. फोनवर तो बोलतोय, आणि त्याला फक्त तुझ्याशीच बोलायचंय.''

मान डोलावून लॉरीनं बेडजवळच्या टेबलावर असलेल्या फोनवर हात ठेवला; पण तो लगेच उचलला नाही. तिनं एक भला मोठा श्वास घेतला– स्वतःला सावरण्यासाठी. तिचं डोकं जणू काल रात्री प्रचंड दारू प्यायल्यानंतर येणाऱ्या हँगओव्हरसारखं प्रचंड दुखत होतं.

''हॅलो.'' तिनं भयंकर थकलेल्या आवाजात म्हटलं.

''तुझ्या नवऱ्याला सांगून ठेव, की मी जेव्हा कधी फोन करेन, तेव्हा फक्त तुझ्याशीच मला बोलायचं असेल. समजलं? तो पुन्हापुन्हा सांगत होता, की 'तू  माझ्याशी बोल.' असं जर परत झालं, तर तुझ्या पोराची काही खैर नाही. प्रत्येक वेळी त्याचं एखादं बोट, कान वगैरे कापून तुझ्याकडे पाठवून देईन मी.''

''माझा मुलगा आता आहे का तुमच्याजवळ?''

''नाही. तिकडे गाडीत आहे; पण आज दुपारी मी परत कॉल करेन, तेव्हा माझ्याबरोबर आणेन त्याला. आता आमच्या मागण्या काय आहेत ते ऐक. लक्षात ठेव, की पोलिसांना कळवलंस तर त्या पोराचे हाल करेन मी. आता दुसरं, आम्हाला दहा लाख डॉलर हवेत; पण रोख नको. नोटांचं फार ओझं होतं. त्यांची हलवाहलवी करायला फार त्रास होतो. हे दहा लाख आम्हाला 'डी परफेक्ट' प्रकारच्या हिऱ्यांमध्ये हवेत. त्यांचा आकार लहान-मोठा कसाही चालेल; पण त्यांची एकूण किंमत दहा लाख डॉलर झाली पाहिजे. न्यू यॉर्कमध्ये ते सहज मिळतील. काही प्रश्न विचारायचे?''

''आमच्याकडे दहा लाख डॉलर नसले तर काय करू आम्ही? ''

लॉरीनं स्पष्ट विचारलं.

''तुम्ही दोघं आहात ना. मग तुम्ही दहा लाख डॉलर कसेही उभे करू शकता.'' पलीकडून ब्रेननं म्हटलं.

''पण आमचे सगळे पैसे आमच्या घरावरच खर्च झालेत.''

''ते तुमचं तुम्ही बघा.'' ब्रेननं म्हटलं आणि फोन ठेवून दिला.

सावकाश रिसीव्हर ठेवत लॉरीनं वळून जॅककडे पाहिलं. ''त्याचं बोलणं ऐकू येत होतं का तुला?''

''हो, बरंचसं बोलणं ऐकलं मी.''

''मला सारखं वाटत होतं, की तो काहीतरी एक विशिष्ट भूमिका पार पाडतोय.''

TBC-28 - Book No. 6




**फ्रेडरिक फोरसाइथ**

अनुवाद

**बाळ भागवत**




एक हत्यासत्र अमेरिका आणि इंग्लंडसारख्या बलाढ्य देशांना हादरवून टाकते... या हत्यासत्राच्या मुळाशी असलेल्या दहशतवादाचा मुकाबला करणाऱ्या ट्रॅकरची चित्तथरारक कहाणी

**किंमत : ३५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

TBC-29 - Book No. 1




**ॲलिस्टर मॅक्लीन**

अनुवाद

**अनिल काळे**




शब्दांचा जादुगार ॲलिस्टर मॅक्लीनच्या कुंचल्यातून साकारलेली... मृत्यूचा अविरत सामना करत सागरी आव्हानांशी दोन हात करणाऱ्या दुसऱ्या महायुद्धातील सैनिकांची शौर्यगाथा...

**किंमत : ४५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

''ग्रोव्हर जे म्हणत होता, की हे लोक अननुभवी आहेत, आणि खंडणीचा मुद्दा त्यांच्या दृष्टीनं दुय्यम महत्त्वाचा आहे, ते आता पटायला लागलंय मला.'' जॅकनं म्हटलं, ''नाहीतर फक्त तुझ्याशीच बोलण्याबद्दल तो इतका ठाम का आहे? त्याला बहुतेक एवढंच बघायचंय, की तू इथेच अडकून पडशील आणि ओसीएमईला जाणार नाहीस.''

''असेलही.'' तिनं निरुत्साहानं म्हटलं. तिच्या दृष्टीनं फक्त एकच गोष्ट महत्त्वाची होती– आपलं बाळ त्या गुंडांच्या ताब्यात आहे, ते त्याला दुखापत करण्याची धमकी देताहेत, आणि तो सुखरूप आपल्याकडे परत आला पाहिजे. बस्स, बाकी त्यांचा उद्देश काय आहे याच्याशी तिला काहीच कर्तव्य नव्हतं.''

''तुला काही आणून देऊ का मी?'' जॅकनं मृदू आवाजात विचारलं.

''नको.'' या क्षणी तिला प्रचंड अगतिक वाटत होतं. कशातच रस वाटत नव्हता.

''लॉरी, मला वाटतं तू शॉवर घे, म्हणजे बरं वाटेल तुला. नंतर थोडातरी ब्रेकफास्ट घे. आपण काल दुपारपासून काहीच खाल्लेलं नाही.''

''नको. मला भूक नाही.''

''तेच तर म्हणतो मी. शॉवर घे, म्हणजे तुला भूकही लागेल.''

''तू जा इथून. मला एकटीच राहू दे.'' लॉरीनं जरा चिडून म्हटलं, ''मला शॉवर नको, ब्रेकफास्टही नको. मला इथे असंच बसू दे.''

''ओके.'' जॅकनं समजुतीनं म्हटलं, ''तोपर्यंत मी आपल्या घरात असलेल्या त्या पोलिसाला जाऊन भेटतो. त्या कॉलचं त्यानं काय केलं हे बघतो. त्याचं नाव आठवतंय का तुला?''

''छे, मला ते मुळात कधी समजलंच नाही.'' लॉरी पुन्हा बेडवर आडवी झाली. तिच्या मनातलं ते जुनं नैराश्य हळूहळू डोकं वर लागलेलं होतं. आपल्याला झोप आली तर फार बरं, असं तिला वाटत होतं; पण झोप येणं शक्य नाही, हेही माहीत होतं. एकाच वेळी तिला भयंकर मानसिक थकवा, निराशा आणि कमालीची उद्विग्नता, अशा तिन्ही गोष्टी जाणवत होत्या.

पायऱ्या उतरून जॅक त्या छोट्या गेस्टरूमपाशी गेला, आणि त्यानं दार ठोठावलं. ते लगेचच उघडलं गेलं. साध्या कपड्यातल्या त्या पोलिसानं लगेच स्वत:ची ओळख करून दिली. ''मी सार्जंट एडविन डी. गनर.''

''मला आताच आठवलं, की तुम्हाला काहीच खायला-प्यायला

मिळालेलं नसेल.'' जॅकनं काहीशा अपराधी स्वरात म्हटलं, ''काही ब्रेकफास्ट आणून देऊ का तुम्हाला?''

''नुसती कॉफी मिळाली तर फार बरं होईल.'' एडविननं म्हटलं.

मला ब्रेकफास्टची सवय नाही.''

''आता आलेला कॉल ऐकलात तुम्ही? तो अपहरणकर्ताच बोलत होता.''

''हो, ऐकला ना.'' जॅकपाठोपाठ पायऱ्या चढत त्यानं म्हटलं.

''ट्रेस केलात?''

''केला ना.''

''मग? कुठून केला होता?''

''न्यू यॉर्कमधल्या एका पब्लिक फोनवरून. लोअर ईस्ट साईडला असलेल्या एका चोवीस तास उघड्या असणाऱ्या लाँड्रोमॅटमध्ये आहे हा पब्लिक फोन. मी लगेच आमच्या लोकांना कळवलं, आणि लगेच एक गस्तीवर असलेली पोलीस कार तिकडे गेलीही; पण यातून काही फारसं हाती लागेल असं नाही, कारण तो कॉल करणारा माणूस केव्हाच तिथून निघूनही गेला असेल.''

''हो, खरंय.'' जॅकनं म्हटलं. त्याच्या मनात चमकून गेलं– तो माणूस कॉल करत असतानाच आपण तिथे असतो, आणि आपल्या हातात एखादी पहार किंवा गज असता, तर...

◆

**श्रद्धांजली - गिरिजा कीर**



बालसाहित्यकार, कथाकथनकार आणि सिद्धहस्त लेखिका गिरिजा कीर यांचं महिनाभरापूर्वी दीर्घ आजाराने निधन झालं. त्या ८६ वर्षांच्या होत्या. त्यांनी आतापर्यंत ११५ पुस्तके लिहिली आहेत. त्यांचा 'आकाशवेध' हा कथासंग्रह आणि 'जन्मठेप' हा ललित लेखसंग्रह मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केला. सहा वर्षं येरवडा तुरुंगातील कैद्यांवर संशोधन करून त्यांनी हा ललित लेखसंग्रह लिहिला होता. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्स यांच्यातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# पुस्तक परिचय



# रूप करा सुरूप

२८ दिवसांत अधिक तरुण, अधिक मुलायम
आणि सुंदर त्वचेसाठी

**जेसिका वू**

अनुवाद

**मीना संभू-शेटे**

मला आठवते तेव्हापासून त्वचा आणि त्वचेची काळजी या समस्येने मी सतत ग्रस्त असे. दक्षिण कॅलिफॉर्नियात मी वाढले. त्या वेळी दिसायला चांगली असलेली आणि गुलाबी गोऱ्या त्वचेची ख्रिस्ती ब्रिंकली ही सर्फर मुलगी सौंदर्याचा मापदंडच मानली जात असे. प्रत्येक स्त्री आणि प्रत्येक किशोरवयीन मुलीला आपण तिच्यासारखेच दिसावे असे वाटत असे. तैवानी अमेरिकन असल्यामुळे १९६० मध्ये माझे पालक अमेरिकेत आले. ख्रिस्ती ब्रिंकलीसारखी मी दिसणे शक्यच नव्हते. मी आठव्या इयत्तेमध्ये असतानाचा फोटो मी या पुस्तकात दिला आहे. मेकअपच्या थराने माझ्या चेहऱ्यावरची मुरुमे त्यात झाकली गेली आहेत आणि तिच्यासारखे दिसण्याच्या प्रयत्नात मी माझी केशरचना तशीच केली आहे. त्यानंतरही फेस क्रीम्स, मुरमांसाठीची लोशन्स, क्लिअरसिल, नॉक्झेमा अशी अक्षरश: हाताला लागतील ती क्रीम्स आणि लोशन्स मी वापरत असे. अर्थातच स्विमसूट घालणाऱ्या मॉडेलसारखी मी दिसले नाही, तरीही किमान माझ्या चेहऱ्यावरचे व्रण आणि मोठमोठी मुरुमे तरी मी लपवू शकत असे.

मी हायस्कूलमध्ये गेल्यानंतर मात्र अखेरीस माझी आई मला अनेक (प्रौढ आणि पुरुष) त्वचारोगतज्ज्ञांकडे घेऊन गेली. पण त्वचारोगतज्ज्ञाकडची प्रत्येक भेट आधीच्या भेटीपेक्षा अधिक निराशाजनक ठरत होती. एकाने तर माझ्या चेहऱ्यावर एकदम चिकट मलम चोपडले




आणि म्हणाला होता, (त्या दिवसापासून त्याचे ते शब्द मला कायमच आठवत राहिले आहेत.) ''हं, आता ते अधिक चांगलं दिसू लागलंय.'' पण खरे म्हणजे माझ्या मुरमांमध्ये काहीच फरक पडला नव्हता आणि यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नव्हते. मी आधीपेक्षा थोडीशीही वेगळी दिसत नव्हते. खूप वर्षांनंतर मुरमांच्या त्रासातून माझी सुटका झाली. पण त्या वेळी नवीनच समस्या निर्माण झाली होती. मी मोठी झाले होते आणि हे वय चेहऱ्यावर दिसू लागले होते. आता माझ्या चेहऱ्यावर केसांच्या महिरपीबरोबर एका ओळीत सनस्पॉट्स दिसू लागले होते. आशियाई वंशाच्या मुलींमध्ये असे डाग सर्वसाधारणपणे दिसू लागतात. एक-दोन वर्षांनंतर माझ्या डोळ्यांच्या कडेला हसल्यानंतर सुरकुत्या (क्रोज फीट) दिसू लागल्या.

मी त्वचारोगतज्ज्ञ झाल्यावर माझ्या हातात अनेक उत्पादने आली. प्रत्येक क्लिन्सर, टोनर, रिफायनिंग मास्क, मॉश्चरायझिंग सनस्क्रीन, मुरमांवरची मलमे आणि सुरकुत्या कमी करणारी मलमे आणि औषधे माझ्या कार्यालयात पाठवली जाऊ लागली. अगदी तो माल बाजारपेठेत येण्यापूर्वी चाचणीसाठी माझ्याकडे पाठवला जाऊ लागला. पण मी काहीही वापरले तरीही आरशात माझा चेहरा मला पूर्वीसारखाच दिसत असे. सुरकुत्या, वाढत्या वयाचे डाग सर्व जैसे थे. 'बोटॉक्स'मुळे मला काही खरे-खुरे परिणाम मिळाले, पण बाकी परिणाम शून्य! चांगल्या त्वचेच्या शोधार्थ निघालेली पण फसवणूक झालेली दुर्दैवाने मी काही एकमेव स्त्री नव्हते. 'चमत्कार' म्हणून जाहिरात केल्या गेलेल्या नवनव्या उत्पादनांची भुरळ महिलांना पडल्याचे मला दिसत असे. स्कार्लेट जॉन्सनसारखा त्वचेचा पोत आपल्याला लाभेल किंवा केट ब्लँचेटसारखे जादूई तेज आपल्या त्वचेवर येईल अशी हमी देणाऱ्या क्रीमला किंवा गोळीला त्या बळी पडत असत. मला भेटायला येईपर्यंत बऱ्याचशा रुग्णांनी त्वचेची काळजी घेणारी (?) वेगवेगळ्या प्रकारची कित्येक मलमे आणि लोशन्स वापरलेली असत आणि निरुपयोगी अशा उत्पादनांवर बरेच पैसे खर्च केलेले असत. प्रत्येक जणच सातत्याने निराश झालेलीच आढळत असे. असे का होते ते मी तुम्हाला सांगणार आहे.

## त्वचेची काळजी घेण्याच्या उद्योगांची गुपिते

काही वर्षांपूर्वी त्वचेची काळजी घेणाऱ्या मलमाचा माझा स्वत:चा कारखाना उभारण्याची मी तयारी केली. त्वचेची काळजी घेणारी एक कॅच-लाइनही मी तयार केली होती – डॉ. जेसिका वू कॉस्मेक्युटिकल्स - 'चिनी वनस्पतींपासून विशेषत: व्हाइट पिओनी आणि स्कुटेलॅरिया यांच्या काढ्यापासून बनवलेले औषध.' (मी या वनस्पतींच्या काढ्यातील घटकांवर संशोधन केले होते आणि माझा त्यावर ठाम विश्वास होता.) आपण काहीतरी अधिक चांगले, अगदी खरोखरचे औषध आपल्या रुग्णांसाठी तयार केले आहे, याविषयी माझी खात्री होती. मात्र कृतीपेक्षा बोलणे अधिक सोपे असते याचा मला लगेच प्रत्यय आला.

सन २००३ च्या हिवाळ्यात माझ्या या व्यवसायासाठी मी भागीदाराच्या शोधात होते. माझ्या इच्छेचे प्रत्यक्ष उत्पादनात रूपांतर करणाऱ्या कंपनीच्या मी शोधात होते. विशिष्ट दुर्मीळ आणि नाजूक घटकांचा मला मोठ्या प्रमाणात उपयोग करायचा असल्याचे मी अनेक बैठकातून सांगत राहिले. ती वनौषधी फक्त चीनच्या ग्रामीण भागातील फुजिअन प्रांतातच आढळते आणि वर्षातून काही महिनेच ती उगवते. तिची लागवड आणि जगभरात सर्वत्र नेण्याचा तिचा खर्च नक्कीच भरपूर होता हे मलाही मान्य होते. ती एक प्रदीर्घ आणि खर्चिक प्रक्रिया होती. त्यामुळे बहुतेक उत्पादकांनी मला स्वस्त पर्याय सुचवले, ते ऐकून मला आश्चर्य वाटले नाही. त्यानंतर त्यांच्यापैकी एका संभाव्य उत्पादकाने त्या खास वनौषधीचा उपयोग तर करायचा, पण पैसेही वाचवायचे यासाठी मला एक 'नामी' कल्पना सुचवली.


''व्वा! छानच!'' मी तिला उत्तर दिले. ''काय आहे तरी काय ते गुपित?'' मी उत्सुकतेने विचारले.

तिने आपला हात बाहेर काढून पंजा वर केला, मी तिच्याकडे अविश्वासाने पाहत होते. मग माझ्या एखादा मंत्र टाकल्यासारखा आविर्भाव करत ती म्हणाली, ''हे बघ, आपण फक्त चिमूटभर वनौषधी वापरू,'' ती म्हणाली, ''पण घटकांच्या यादीत मात्र आपण त्या वनस्पतीचे नाव अग्रस्थानी ठेवू. त्यामुळे तिचाच वापर आपण भरपूर प्रमाणात केल्यासारखं वाटेल.''

◆

नवं कोरं

# धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर...




लेखक

**परमपूज्य दलाई लामा**

अनुवाद

**रोहन टिल्लू**

नानाविध धर्मांतील बंधुत्वाचा समान धर्म शोधणारी
परमपूज्य दलाई लामा यांची विचारगाथा...

**किंमत : २४०/-रु । पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

---

नवं कोरं

बदलत्या जगातला शाश्वत आनंद

# परमसुखाची पर्वणी




लेखक : **परमपूज्य दलाई लामा**
आणि **आर्चबिशप डेस्मंड टुटू**
सहलेखक : **डग्लस अब्राम्स**
अनुवाद : **मुक्ता देशपांडे**

आयुष्यातील अटळ दु:खांतही परमसुखाचा मार्ग दाखवणारं
दोन परमपूज्य धर्मगुरूंचं पथदर्शक विवेचन...

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/- रु**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**



# एका लालसेने

**प्रेमाचे मनोहारी विभ्रम दर्शवणारा कथासंग्रह**

**मंजुल बजाज**

अनुवाद

**डॉ. शुचिता नांदापूरकर फडके**

सोमवारी सकाळी ६च्या ट्रेननं खानसाहेब मुर्शिदाबादला रवाना होतात. शाकीरला यायला दुपार उजाडते. मुलं शाळेतून घरी येण्याआधी दोन-तीन तास फक्त आमच्या दोघांचे असतात. एखादं गाणं किंवा नृत्य जसं मंद लयीत सुरू होऊन मग उत्कटतेला पोहोचत, खुलतं तसंच काहीसं प्रणयाचंही आहे ना? हलकेच सुरुवात होऊन... शाकीरचे वडील, माझे आणि त्याचेही उस्ताद, आम्हाला नेहमी सांगत असत, ''तुमचा पहिला पदन्यास, पहिला ठेका किती हळुवारपणे उतरतो यावर तुमच्या लयीची उत्कटता आणि शेवटाची नाट्यमयता अवलंबून असते.'' शाकीर आता तबला लावून घेतो आणि मोठ्या नजाकतीनं ठेका धरतो. मी घुंगरू बांधून नाचायला येईपर्यंत त्याला तबल्याच्या बोलांनी भारून टाकलेलं असतं.

पूर्वी, माझ्या पायातले घुंगरू निखळून पडेपर्यंत मी नाचू शकत असे. विखुरलेले ते घुंगरू पाहून वाटायचं की स्वर्गातून मुक्त हस्तानं आशीर्वादाची उधळणच झाली आहे आमच्या दोघांवर – आमचे उस्तादजी तर नेहमी म्हणत की, नर्तकाच्या स्वत:च्या समजून घेण्याच्या क्षमतेवर कथ्थक नृत्याच्या प्रकटीकरणाचं कौशल्य अवलंबून आहे. कथ्थकमधला कोणताही




तोडा तुम्ही केवळ शंभर नाही, तर हजार प्रकारांनी सादर करू शकता. तुमची कल्पनाशक्ती, तुमची ऊर्मी आणि तुमचे विचारतरंग एकत्र आले की नृत्य रंगणारच. हं, मात्र तुमच्यामध्ये कल्पनाशक्तीचा अभाव असेल, तर मग काही न बोललेलं बरं. नृत्याच्या नूतन आविष्कारापासून नर्तकाला फारकत घ्यायला लावणारी दुसरी गोष्ट म्हणजे नर्तक आणि वादक यांच्यामध्ये ताळमेळ नसणे. शाकीर आणि मी... आमच्यात हा प्रश्न कधीच उद्‌भवला नाही.

शाकीर अगदी हलकेच बोल वाजवायचा- धा, गे, ना, तिरकीट्... त्या प्रसन्न शांततेमध्ये प्रत्येक बोल अगदी अलगद, पण स्पष्ट उमटायचा. तालाला रुंजी घालायला लावण्याचं सामर्थ्य त्यात असायचं. त्याने वाजवलेले बोल उचलत उस्तादजी सुरू करायचे. ता थै तत् तत् ता- थै- तत् - तिगडा- दिग् दिग् -थै ता- थै... तेच बोल माझ्या घुंगरातून निघू लागायचे. माझी पावलं थिरकू लागायची. आम्ही तिघेही त्या तालावर स्वार व्हायचो. हिंदी सिनेमातील प्रेमात पडण्याची दृश्यं आठवली की आजही मला हसू येतं. ते झाडामागून पाहाणं, फुलपाखरं, पक्षी, चांदण्या रात्री अन् काय अन् काय! या कशाची गरज नसते प्रेमात पडायला. ना कुठल्या ईश्वरी संकेताची गरज असते आपला प्रियकर ओळखायला – तिथे ना नाद हवा ना रंगाची उधळण. एकमेकांच्या सहवासात असताना एक अनोखी शांतता हलकेच त्या दोघांनाही प्रेमाच्या समान धाग्यात लपेटते. त्या नीरव शांततेची व्याप्ती हीच जणू त्यांच्या प्रेमाची ओळख बनते.

''कथ्थक शिकवणाऱ्याच्या मुलाचं भवितव्य असं कितीसं उज्ज्वल असणार आहे?'' माझी वयस्कर आत्या त्या दिवशी ठासून म्हणाली.

''आपल्या आमराया खानसाहेबांकडे गहाण पडल्या आहेत. तू जर नकार दिलास तर आपण अक्षरश: रस्त्यावर येऊ,''– अम्मीनं पुष्टी जोडली.

''तू एकुलती एक आहेस, तेही मुलगी. तुला वाटलं तरी कसं की तू प्रेमविवाह करू शकशील?'' नज्मानं –माझी मैत्रीण– माझी कानउघडणी केली.

प्रत्येक शेतकरी आपल्या बागेमधलं सर्वांत रसरशीत फळ राखून

ठेवतो, येणाऱ्या विशेष पाहुण्यांकरिता. मी आता तारुण्याने मुसमुसले होते, माझ्या वडिलांच्या आमराईमधला सर्वाधिक चवदार, रसरशीत, गच्च भरलेला आंबाच जणू! आमच्या कुटुंबाकरिता खानसाहेब सर्वेसर्वा बनले होते. लावून दिलं माझं लग्न त्यांच्यासोबत. आता वडिलांच्या हयातीत तरी त्या आमराया त्यांच्याच असणार होत्या. त्यांच्या माघारी आमराया आणि त्यांची खरी मालकीण म्हणजे मी– आमच्यावर खानसाहेबांचा हक्क असणार होता.

त्यांच्याशी लग्न करण्याआधी मी पण माझी अट समोर मांडली. माझं नृत्य माझं जीवन होतं. माझं लग्न हा एक सौदा होता. प्रत्येकजण आपला स्वार्थ आणि नफा दोन्ही जपत होते. माझ्यामुळे तर सगळ्यांना बरकत होती ना? मग मी कशी मागे राहाणार?

माझ्या आईची आणि माझीही अतिशय आवडती हिंदी सिनेमा नटी मरताना अगदी एकाकी होती. तिला सोबत होती ती केवळ तिच्या कवितांची आणि दारूची. आपल्या नवऱ्याकडून घटस्फोट मिळाल्यावर त्याला उद्देशून केलेल्या एका कवितेमध्ये तिने त्याला विचारलं होतं–

'तू माझी मेहर परत केलीस खरी-
परंतु तुझ्यावर उधळून दिलेलं माझं तारुण्य...
ते तू मला परत करू शकतोस का?'

तिने स्वत:ला मुक्तपणे उधळून लावलं होतं. मी तसं नक्कीच करणार नव्हते. माझ्या दृष्टीने माझ्यासाठी अनमोल असलेलं माझं नृत्य, माझा जणू श्वास- तो चालू राहायलाच हवा होता.

लग्नानंतर पहिल्यांदा माहेरी येणार होते मी. आत्यानं शाकीरला पाठवलं होतं मला घेऊन येण्यासाठी. घरी पोहोचण्याआधी आम्ही आमराईमध्ये शिरलो. शाकीर माझ्यावर कोसळला तेव्हा मी त्याला म्हटलं होतं, ''काही आंबे फांदीवरून अलगद तोडून खायचे असतात ना?'' शाकीरचं ते इतकं आसुसलेलं रूप मी त्या आधी कधी अनुभवलं नव्हतं; पण त्याने तरी मला इतकं नटलेलं कधी पाहिलं होतं?

घरी पोहोचल्यावर आत्यानं मला तडक तिच्या खोलीमध्ये नेलं होतं. माझ्या चेहऱ्यावरचा विस्कटलेला मेकप हलकेच नीट करता-करता ती म्हणाली होती, ''कसं आहे ना! चोरी करताना पकडलं जाणं हा गुन्हा आहे. तेव्हा आपण कधीही पकडले जाणार नाही याची काळजी घे.'' तिच्या

बोलण्याचं गांभीर्य तिच्या डोळ्यांतून प्रतीत होत होतं. तिला काय म्हणायचं आहे हे मी अचूक ओळखलं.

सोपं नव्हतं ते सगळं. किती चढउतार पाहिले शाकीरने आणि मी. कधी महिनोन् महिने उपास घडायचा एकमेकांशिवाय. नोकरीसाठी तो दोन वर्षं जेदाहला राहिला होता. त्या वेळी तर... मुर्शिदाबादसारख्या छोट्या शहरात सगळे सगळ्यांना नावानिशी ओळखतात. आम्हाला एकमेकांची नजरभेटसुद्धा दुरापास्त होती. गेल्या तीन-चार वर्षांत मात्र माझ्या जिवाला थोडीशी का होईना पण शांतता लाभली आहे. अर्थात, त्याकरिता मला काय-काय क्लृप्त्या लढवायला लागल्या ते माझं मला ठाऊक. अतिशय काळजीपूर्वक योजना आखून, अनेक गोष्टींकडे कानाडोळा करून मोठ्या हिकमतीने मी पावलं टाकली. मला मनापासून हवीशी असणारी एकमेव व्यक्ती होती शाकीर, त्याच्यासाठी वाट्टेल ते करायची माझी तयारी होती. त्याला मी सौदी अरेबियाहून परत यायला लावलं. आम्ही दोघं एकत्र येण्याचा एखादा राजरोस मार्ग मी तयार करीन अशी ग्वाही दिली.

माझं सामान भरून, मुलांना घेऊन, कलकत्त्याला येण्यासाठी मी जेव्हा ट्रेनमध्ये बसले तेव्हा माझ्या अम्मीने अक्षरश: टाहो फोडला. मी कुटुंबाच्या परिघातून बाहेर पडते आहे म्हणून होणारं ते दु:ख होतं का? छे! मुळीच नाही. जसा मी त्या घराचा उंबरठा ओलांडला तशा 'त्या' जुळ्या बहिणी– 'भीड आणि लाज' कायमच्या माझ्या आयुष्यातून हद्दपार झाल्या, माझ्यासाठी तर मेल्याच– त्यांच्या मृत्युप्रीत्यर्थ तिने व्यक्त केलेला शोक होता तो. तिला कळलं नव्हतं की, त्या जुळ्या बहिणींची हकालपट्टी मी फार पूर्वीच केली होती. कथ्थक शिकता-शिकता आपसूक ते होत गेलं. जमिनीवर पावलांचा आघात करताना, कंबरेला झटके देताना, नितंबांना झुलवताना, हातांना हवेत मुक्त विहरू देताना, नजरेचे विभ्रम आत्मसात करताना, नर्तनाचा आविष्कार स्वत:मध्ये पूर्णपणे भिनवताना आणि विशेष करून कथ्थकचे अविभाज्य अंग असणाऱ्या गिरक्या घेताना अत्यावश्यक असलेला समतोल साधत असताना हळूहळू, प्रत्येक पायरीवर त्या अदृश्य जुळ्या बहिणी माझ्यापासून दूर-दूर होत गेल्या. त्यांच्या त्या जीवघेण्या पकडीतून, मी जाणीवपूर्वक आणि निश्चयाने स्वत:ची सुटका करून घेतली होती.

◆



# बेंजामिन फ्रँकलिन

एक आत्मचरित्र

**(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**


अमेरिकेच्या चतुरस्त्र आणि अलौकिक बुद्धिमत्तेच्या माणसाने सांगितलेली स्वत:च्या आयुष्याची प्रांजळ कहाणी

**अनुवाद : सई साने**

---

लहानपणापासूनच मला वाचनाची आवड होती आणि मला जे काही पैसे मिळत असत ते सगळेच्या सगळे पुस्तकांमध्ये जात. 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' हे पुस्तक मला इतकं आवडलं होतं की, माझा पहिला पुस्तकसंग्रह मी जॉन बन्टानच्या निरनिराळ्या पुस्तकांचा केला होता. काही दिवसांनंतर मला आर. बर्टनचे 'हिस्टॉरिकल कलेक्शन्स' घ्यायचे होते. म्हणून मी तो विकूनही टाकला. ही छोटीछोटी ४०-५० पुस्तकं होती. स्वस्त होती.* माझ्या वडिलांच्या संग्रहात काही धार्मिक वादविवादांची पुस्तके होती, ज्यातील बरीचशी मी वाचलीही होती. त्यानंतर मी अनेक वेळा या गोष्टीचा पश्चात्ताप केला आहे की, ज्या वेळी मला वाचनाची इतकी ओढ लागली होती, त्या वयात मला योग्य पुस्तकं वाचायला मिळाली नाहीत. कारण आता एक गोष्ट जवळजवळ निश्चित झालं होतं की, मी धर्मगुरू होणार नव्हतो. 'प्लुटार्क यांचं 'लाइव्ह्ज' हे पुस्तक मी अनेक वेळा वाचलं. आजही मला वाटतं की, तो वेळ सत्कारणी लागला. डी फो यांचे 'एसे ऑन प्रोजेक्ट' आणि डॉक्टर मॅथर यांचे 'एसेज टु डू गुड' या पुस्तकांनी माझ्या विचारांना वळण लावलं. ज्याचा माझ्या भविष्यातील काही घटनांवर परिणाम झाला.

हा पुस्तकांकडे असणारा कल बघून माझ्या वडिलांनी मला मुद्रक बनवायचं ठरवलं. खरं म्हणजे त्यांचा एक मुलगा जेम्स आधीच त्या व्यवसायात होता. १७१७ मध्ये माझा भाऊ जेम्स इंग्लंडहून छापखान्याचे सर्व साहित्य घेऊन बोस्टनला व्यवसाय सुरू करण्याच्या हेतूने आला. माझ्या वडिलांच्या मानाने मला हे काम जास्त आवडले; पण तरीही समुद्राची ओढ होतीच. ती टाळण्याकरता माझ्या वडिलांना मला माझ्या भावाबरोबर अडकवून टाकायचे होते. काही काळ मी ते टाळण्याचा प्रयत्न केला, ताणून धरलं, पण शेवटी ते मान्य करावंच लागलं आणि मी नोकरी स्वीकारली. वयाच्या केवळ बाराव्या वर्षी. मी ही उमेदवारी वयाच्या एकविसाव्या वर्षांपर्यंत करायची होती आणि अनुभवी कर्मचारी म्हणून मला फक्त शेवटच्या वर्षी पगार मिळणार होता. थोड्याच काळात मी त्या कामात प्रभुत्व मिळवलं आणि माझ्या भावाच्या उपयोगी पडू लागलो. आता जणू मला चांगल्या पुस्तकांच्या जगात प्रवेश मिळाला होता. पुस्तकविक्रेत्यांकडे काम करणाऱ्या शिकाऊ उमेदवारांशी झालेल्या ओळखीमुळे कधीकधी मला एखादं छोटंसं पुस्तक वाचायला मिळत असे. काळजीपूर्वक हाताळून आणि शक्य तेवढ्या लवकर ते पुस्तक मी वाचून परत करत असे. काही वेळा एखाद्या संध्याकाळी मला ते पुस्तक गुपचूप मिळत असे आणि कोणाच्या लक्षात येऊ नये म्हणून ते सकाळी परत द्यायचे असायचे. अशा वेळी मी रात्री उशिरापर्यंत जागून पुस्तक पूर्ण करत असे.




आमच्या छापखान्यात मि. मॅथ्यू ॲडम्स नावाचे एक हुशार व्यापारी नेहमी येत असत. काही काळ गेल्यावर माझे वाचनाचे वेड त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मला त्यांचे ग्रंथालय खुले करून दिले आणि आवडतील ती पुस्तकं वाचण्याची परवानगी दिली. आता माझं लक्ष कवितेकडे वळलं होतं. मी काही कविता लिहिल्याही होत्या. माझ्या भावाला वाटलं त्यातून फायदा होईल म्हणून त्याने मला लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिलं. मला त्याने बॅलड* लिहिण्यास सांगितले. त्यातील एकाचे नाव होते ‘लाइट-हाउस ट्रॅजिडी’. कॅप्टन वर्दीलेक आणि त्याच्या दोन मुली बुडून मेल्या त्याचं कथानक या बॅलडमध्ये होतं. दुसरं होतं एका खलाशाचं गाणं. टिच (किंवा ब्लॅकबिअर्ड) नावाच्या चाच्याचे गाणे. ते अगदी खालच्या दर्जाचं दुःखद लिखाण होतं.

जेव्हा ते छापून तयार झालं, तेव्हा ते विकण्यासाठी त्याने मला गावभर फिरायला लावलं. पहिलं काव्य बऱ्यापैकी विकलं गेलं; कारण ती घटना नुकतीच घडून गेलेली असल्याने लोकांच्या मनात ताजी होती. त्याने माझा अहं जरा सुखावलाच. पण माझ्या वडिलांनी मात्र त्यावर सडकून टीका केली. वर हेही बजावलं की, कवी लोकांना कायम इतरांपुढे हात पसरण्याची वेळ येते. अशा रीतीने मी एक वाईट कवी झालो असतो, तो थोडक्यात वाचलो. गद्य लेखन मात्र माझ्या आयुष्यात मला कायमच हात देत आलं आणि माझ्या प्रगतीतही त्याचा मोठाच सहभाग असल्याने ते कौशल्य या अशा परिस्थितीत मी कसं मिळवलं, ते मी तुला सांगतो.

जॉन कॉलिन्स नावाच्या अजून एका पुस्तकप्रेमी मुलाशी माझी जवळची मैत्री झाली. काही वेळा आम्ही वादविवाद करत असू. एकमेकांचे म्हणणे खोडून काढण्याची चढाओढ आमच्यात लागत असे. ही वादाची खुमखुमी खरंतर चांगली प्रवृत्ती नाही. सतत वाद घालणारे लोक अप्रिय ठरण्याची भीती असते. चारचौघांत असताना जेव्हा वादासाठी विरोध केला जातो, तेव्हा तिथला माहोल तर बिघडतोच; पण जिथे मैत्रीच्या शक्यता असतात तिथे तिरस्कार आणि शत्रुत्व निर्माण होऊ शकतं. हे मी माझ्या वडिलांकडची धार्मिक विवादांची पुस्तकं वाचून शिकलो. शहाणीसुरती माणसं क्वचितच या भानगडीत पडतात. अपवाद फक्त वकील, युनिव्हर्सिटीतील आणि एडिनबरोचे लोक.

एकदा कॉलिन्स आणि माझ्यात कशावरून तरी वाद सुरू झाला. विषय होता- स्त्रियांच्या शिक्षणाचे औचित्य आणि त्यांची शिकण्याची क्षमता. त्याचं मत होतं की, ते योग्य नाही आणि नैसर्गिकपणेच त्या शिक्षणासाठी सक्षम नसतात. मी त्याच्या विरोधी मत मांडलं. कदाचित जरा वाद घालण्याच्या हेतूनेच असेल, त्याने मोठा वक्तृत्वपूर्ण वाद घातला. काही वेळा त्याने आपल्या विचारांपेक्षा त्यांच्या चमकदार बोलण्याने मला अगदी नामोहरम करून टाकलं. आमच्या वादातून कोणताही निष्कर्ष न काढताच आम्ही घरी गेलो. आता काही काळ आमची भेट होणार नव्हती. म्हणून मी बसून माझे मुद्दे संगतवार लिहून काढले आणि त्याचे पक्के टाचण त्याला पाठवून दिले. त्याने त्यावर दिलेल्या उत्तरावर मी परत माझं उत्तर पाठवलं. अशी दोन्ही बाजूंनी साधारण तीन-चार वेळा पत्रापत्री झाल्यावर एके दिवशी चुकून ते कागद माझ्या वडिलांच्या हाताला लागले.

◆

**अॅड. बाबूराव कानडे लिखित दोन नवीन पुस्तके**

# काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र




**किंमत : २२०/-रु । पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

काँग्रेससाठी हुकमी एक्का असलेले अत्रे आणि काँग्रेस यांचे बिनसले ते ‘संयुक्त महाराष्ट्र’ या कल्पनेला असलेल्या काँग्रेसच्या विरोधामुळे. तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आंदोलकांवर गोळीबाराचा दिलेला आदेश, त्यात सव्वाशेहून अधिक जणांचा गेलेला बळी, यशवंतरावांनी नेहरूंना महाराष्ट्राहून श्रेष्ठ म्हटले इ. सर्व प्रकारांनी अस्वस्थ आणि संतप्त झालेल्या अत्रे यांच्या वाणीला आणि लेखणीला धार चढली. नेहरू-यशवंतराव आणि काँग्रेसवर त्यांनी जणू तोफाच डागल्या. अत्रे यांच्या लेखणीचा हा धगधगता आविष्कार म्हणजे ‘काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र!’

---

# आचार्य अत्रे
## बारा गावचं पाणी




**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/- रु**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

आचार्य अत्रे... साहित्यिक, शिक्षक, पत्रकार, संपादक, दिग्दर्शक, वक्ते इ. त्यांचे विविध पैलू वेगवेगळ्या प्रकाराने समोर येत राहिले. त्यांनी विविध ठिकाणच्या महत्त्वपूर्ण घटनांतून नोंदवलेल्या सहभागातून इतिहास घडत गेला. त्या इतिहासातून त्यांच्या अष्टपैलुत्वाचं दर्शन घडविणारं पुस्तक आहे ‘आचार्य अत्रे : बारा गावचं पाणी’. मग १९४६ च्या बेळगाव येथील संयुक्त संमेलनातील अत्र्यांचा सहभाग आणि या संमेलनाच्या निमित्ताने संयुक्त महाराष्ट्र, भाषावार प्रांतरचनेचा झालेला उच्चार असेल किंवा गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी घेतलेली उडी असेल...

# पुस्तक परिचय



# स्वजाणिवेतून स्वास्थ्यप्राप्ती

**(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**

अंरर्मनातल्या वेदनांवरचा रामबाण उपाय... मनावर उपचार करून आरोग्य सुधारण्याचा नामी मंत्र...

## डॉ. न्यूटन कोन्दाविती


अनुवाद
**डॉ. अश्विनी धैसास**

---

आमची मैत्रीण माया ही दहा वर्षांपासून अर्धशिशीच्या (मायग्रेन) विकाराने त्रस्त होती. सर्व प्रकारचे डॉक्टर व उपचार करून झाले. या त्रासदायक आजारातून सुटका होण्यासाठी तिने शेकडो पुस्तके पालथी घातली. मिळतील न मिळतील ते उपाय केले. आजोबांकडून येणाऱ्या अनुवांशिकतेपासून ते हवामान किंवा मांजरीच्या गळणाऱ्या केसांपर्यंत सर्व गोष्टींना जबाबदार ठरवून झाले!

आणि एका संध्याकाळी नवल घडले. आपल्या सासूबाईंजवळ बसून ती मनमोकळेपणाने बोलली. सासूबाईंनी चांगल्या हेतूने दिलेल्या पण सततच्या सूचना, प्रत्येक कामातली त्यांची ढवळाढवळ, घरातल्या सगळ्यांवर त्यांचे असणारे बारीक लक्ष तिला खूप त्रासदायक वाटत होते. अतिशय कार्यक्षमतेने कामाचा मोठा भार सांभाळणाऱ्या उच्चपदस्थ मायाला तिच्या

घरी राहायला आलेल्या सासूबाईंची देखरेख जाचत होती. परंतु हे करण्यामागची सासूबाईंची भूमिका चांगली व मदत करण्याची आहे, अशी स्वतःची समजूत घालत ती कायमच गप्प बसत होती.




त्या संध्याकाळी सासूबाईंजवळ बसून तिने स्वत:ला काय वाटते ते मोकळेपणे सांगितले. सासूबाईंनी तिचे म्हणणे मनापासून मान्य केल्यामुळे तिच्या मनावरचा ताण एकदम उतरला, डोक्यावरचा बोजा गेला आणि काय आश्चर्य! सकाळपासून येऊ घातलेली अर्धशिशीची धमकावणी कुठल्या कुठे नाहीशी झाली.

त्या दिवशी सासूबाईंबरोबरच्या मनमोकळ्या संवादानंतर अर्धशिशीचा त्रास खूपच कमी झाला, असे साधारण १५ दिवसांनी मायाच्या लक्षात आले. अर्धशिशीच्या 'खऱ्या' कारणाचा माया विचार करू लागली. सततच्या सूचना व ढवळाढवळीमुळे येणारी चीड हे त्याच्यामागचे कारण तिच्या ध्यानात आले. हा धागा एकदा समजल्यावर तिने शरीराच्या इतर अवयवांकडे काळजीपूर्वक लक्ष द्यायला सुरुवात केली आणि थोड्याच दिवसांत 'आपुला संवाद स्वशरीराशी' अशी तिची स्थिती झाली. अंगांगामधील संदेशांची भाषा उमजू लागली.

मायाचे डोके तब्बल दहा वर्षांपासून तिला संदेश देण्याचा प्रयत्न करत होते. काही मनात न ठेवता मोकळेपणाने स्वतःला व्यक्त कर. आपण अनेक निर्बंध घालून मनाला उत्स्फूर्तपणे व्यक्त होण्यापासून वंचित करतो आणि आत्म्याच्या स्वाभाविक स्थितीपासून विचलित होतो. आत्म्याचे भौतिक प्रतिनिधित्व करणारे शरीर आपणास सिग्नल किंवा संदेश देऊ लागते.

यावरून आपल्याला असे लक्षात येते की, शरीरात काही लक्षण दिसते किंवा त्रास सुरू होतो तेव्हा औषधोपचार करून तो भाग काढून किंवा बदलून प्रश्न सुटत नाही. असणारा त्रास शरीराच्या दुसऱ्या भागात उद्भवतो, इतकेच. आपल्या शरीराशी संवाद साधणे हा स्वास्थ्याकडे नेणारा थेट व

जवळचा मार्ग आहे.

संपूर्ण स्वास्थ्य ही आपल्या शरीराची नैसर्गिक स्थिती आहे. तसेच या स्थितीमध्ये लवकरात लवकर पोचण्याची अंतर्गत व्यवस्थाही निसर्गाने केलेली आहे. फक्त आपल्या जिवलग मित्र-मैत्रिणीसारखेच आपल्या शरीराच्या प्रत्येक भागाशी संबंध मात्र प्रस्थापित करायला हवेत. जेव्हा काही तरी सांगायचे असते तेव्हाच शरीर आपले लक्ष वेधून घेते. मनातला निरोप खोलीत समोर बसलेल्या खास मित्राला सांगण्यासाठी एक कटाक्ष किंवा पुसटसे हास्यही पुरेसे असते, नाही का? एखाद्या विशिष्ट प्रकारे टाकलेला कटाक्ष किंवा सहेतुक हास्य एक विशिष्ट संदेश देते. इतर वेळी मात्र मी व मित्र आपापले काम करण्यात गर्क असतो.

मग आपले स्वत:चे शरीर हा आपला अगदी जिवाभावाचा मित्रच नव्हे का? त्याच्या बाबतीत वेगळे कसे घडेल? अशा खास मित्राचे खास संदेश आपल्याला समजायला काहीच सायास पडायला नकोत. खरे ना?

आपले शरीर म्हणजेच आत्म्याचे भौतिक रूप, हे जेव्हा नैसर्गिक स्थितीत असते तेव्हा सर्वांत आनंदात, सुखात असते. विपुलता व उत्स्फूर्तपणाने परिपूर्ण अशा या आनंदमयी अवस्थेमध्ये शरीराच्या माध्यमामधून एक अभिव्यक्तीचा मुक्त प्रवाह वाहत असतो. अशा वेळी शरीराबरोबरच आत्माही स्वास्थ्यपूर्ण अवस्थेमध्ये विविध अनुभवांची पडताळणी करत जीवनाचा प्रवास करत असतो.

एखादा निरोप देण्यासाठी ज्याप्रमाणे पाणबुड्याच्या कमरेच्या दोराला हिसका दिला जातो, त्याचप्रमाणे काही संदेश देण्यासाठी शरीर आपले लक्ष वेधून घेते. सुखद संवेदना जशा सकारात्मक संदेश देतात, तशाच दुःखद संवेदना आपण नैसर्गिक स्थितीपासून ढळत असल्याचा धोक्याचा इशारा देतात. थोडक्यात काय, कान देऊन ऐकायची तयारी असेल तर आपले शरीर आपल्याशी निश्चित व सुस्पष्ट संवाद साधत असते.

◆

## नवं कोरं

बहुरंगी प्रतिभेचे वारसदार **विजय तेंडुलकर** यांचे विस्मृतीत गेलेले **अमेरिकन क्लासिक्सचे** तीन दुर्मिळ अनुवाद... तब्बल पन्नास वर्षांनंतर पुन्हा वाचकांच्या भेटीस... **(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**




### आगे बढो


नौकानयनशास्त्रात मोलाची भर घालणाऱ्या दर्यावर्दीची चित्तवेधक कादंबरी

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

### भल्या दिलाचा माणूस

अनोळखी तरीही चिरपरिचित आणि आपल्याशा वाटणाऱ्या माणसाची हृद्य कहाणी

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**







### देवाची माणसे

न्यू मेक्सिकोचं सामाजिक जीवन सुधारण्यासाठी दोन ख्रिस्ती धर्मगुरूंनी केलेल्या साहसाची यशोगाथा...

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

# अभिप्राय



*(एका वाचकाने दिलेला पत्ररूपी अभिप्राय)*

आदरणीय,

डॉ. अनिल गांधी सर,

सप्रेम नमस्कार.

मी सुषमा आत्माराम शार्दुल (लग्नानंतरची झारा इम्तियाझ शेख) सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात इंग्रजी हा विषय शिकवते. २०१५मध्ये माझ्या प्रेग्नन्सीच्या काळात मी बऱ्याच डॉक्टरांची आत्मचरित्रे वाचली. त्यातले आपले आत्मचरित्र 'मना सर्जना' मला खूपच आवडले. आपण बरीच पुस्तके वाचतो; पण त्यातील ठरावीक पुस्तके अशी असतात, जी आपल्या मनात कायम घर करून जातात. 'मना सर्जना' हे याच प्रकारातील पुस्तक (आत्मचरित्र) आहे.

त्या वेळेस एखाद्या पुस्तकाविषयी लिहिणे मला सुचलेच नाही. म्हणून मागच्या वर्षापासून ही सुरवात केली आहे. पुस्तकाची प्रस्तावना, तसेच आपले मनोगत वाचताना मनाला एक आनंद व स्फूर्ती मिळते. आपल्यातील प्रामाणिकपणा, नीतिमत्ता, गरिबांविषयी असणारे प्रेम, नावीन्य, जीवनाचे त्रिमिती महत्त्व आणि असे अनेक गुण आपण वाचकांपुढे सुंदर पद्धतीने मांडले आहेत. डॉ. ह. वि. सरदेसाई सरांनी प्रस्तावना खूप सुंदर पद्धतीने लिहिलेली आहे.

तुमच्यातील प्रामाणिकपणा व निर्मळता वाचकास तुमच्या सुरवातीच्या वाक्यानेच येऊन जाते. ''मी मनापासून लिहिलेली, मनातले सांगणारी 'मना सर्जना' ही आत्मकथा वाचकांपुढे सादर केली आहे. त्याची सर्जरी ज्याची त्याने करायची आहे. पण 'निदान' मला कळावे ही इच्छा.''

सर, पुस्तकातील हे वाक्य मला लाख मोलाचे वाटले, 'आपले निर्णय व निश्चय आयुष्य घडविणारे असतात. पैशाने सुखाची सगळी साधनं विकत घेता येतात; पण मनाचे सुख-समाधान नाही.' प्रामाणिकपणा काय असावा, नीतिमत्ता काय असावी किंवा एखाद्या गरजूची सेवा मनापासून कशी करावी या सर्वांचे चित्र पुस्तकातील प्रत्येक पानावर व प्रत्येक ओळीवर आहे.

आजपर्यंत वाचलेल्या अनेक पुस्तकांपैकी हे आत्मचरित्र (मना सर्जना)

अफलातून आहे. या चार वर्षांच्या काळात ठरावीकच पुस्तकांचे शीर्षक लक्षात राहिले. त्यातील एक रेखीव पुस्तक व कायम आठवणीत राहील असेच हे आत्मचरित्र आहे.




आमच्याकडे एका बक्षीस समारंभास बीआरसीचे शास्त्रज्ञ आले होते. विद्यार्थ्यांना मोटिव्हेट करण्यासाठी त्यांनी एक अनमोल वाक्य म्हटले होते, ''जेव्हा आपण एखाद्या अनुभवी माणसाचे पुस्तक वाचतो, म्हणजेच आपल्याला त्याचा ५० ते ६० वर्षांचा अनुभव मिळतो.'' मी या वाक्याशी पूर्णपणे सहमत आहे. इतरांना सर्वतोपरी मदत करणे हे तुमच्या संस्कारातच आहे. त्यामुळे तुमच्या संस्काराने तुमची मुले व त्यांची पुढची पिढी त्यावर पाऊल ठेवून पुढे जात आहे.

डॉक्टर म्हणून व्यवसायातील नीतिमत्ता किती महत्त्वाची आहे, केवळ पैसा हाच आयुष्याचा भाग नसून माणुसकी किती महत्त्वाची आहे, याचे सुंदर उदाहरण म्हणजेच डॉक्टर अनिल गांधी यांचे जीवन, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

तुमच्या लिखाणात प्रेम, न्यायबुद्धी, प्रामाणिकपणा हा ओतप्रोत भरलेला आहे. तुमच्या प्रामाणिकपणाबद्दल कितीही वाक्यं लिहिली तरी ती कमी पडतील.

व्यवसायापेक्षा आपण माणुसकी कशी जपली पाहिजे, हे तुम्ही खरेच उत्तम पद्धतीने तुमच्या अनुभवांतून दाखवून दिले आहे.

तुमच्या ८०व्या वाढदिवसाचा फोटो पाहताना मनात सहज एक प्रश्न निर्माण झाला, जर डॉ. अनिल गांधी यांनी लहानपणापासून असा डॉक्टर होण्याचा निग्रह केला नसता तर ही फोटोतील सर्व मंडळी या पदापर्यंत पोहोचली असती का? एकट्या व्यक्तीच्या बदलाने किती पिढ्या बदलू शकतात याचे जिवंत उदाहरण म्हणजे डॉ. अनिल गांधी हे आहेत. विद्यार्थी दशेत व डॉक्टर झाल्यावरही तुम्ही इतरांना केलेली मदत ही खरंच वाखाणण्यासारखी आहे. तुमचे अर्थविषयक विचार, वेगवेगळ्या ट्रस्टसाठी केलेले मोलाचे सहकार्य, त्याग, स्वत: एक डॉक्टर असतानासुद्धा, वैद्यकीय क्षेत्रातील नीतिमत्ता कशी असली पाहिजे, हे आणि असे सगळेच विचार

वाचकास एक आदर्श व्यक्ती व विचारसरणी देऊन जातात.

पुस्तक वाचताना अनेक प्रश्न मनात होते. त्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे पुस्तकात मिळाली, याचे मला समाधान आहे. तुमच्या साहित्य परिचय कोषात तुम्ही नोंदवलेली सर्वच पुस्तके माझ्या आवडीची आहेत.

सर, तुमच्या लिखाणात, बोलण्यात प्रचंड नम्रता, प्रेम, प्रामाणिकपणा, आपुलकी ओतप्रोत भरलेली आहे. अजय सरांची खेळातील व अभ्यासातील आवड यामुळे त्यांनी प्रगतीचे उंच शिखर गाठले आहे, ही खूप अभिमानाची गोष्ट आहे.

एकदा एका पुस्तकात मित्तल ग्रुप आणि मित्तल सरांविषयी वाचले होते. पाच ते सहा वर्षांपूर्वी जेव्हा मी पुण्यात आले होते तेव्हा बऱ्याच ठिकाणी त्यांच्या नावाचे बोर्ड होते; पण हेच तुमच्या पुस्तकांतून वाचताना थोडा अभिमान वाटला; कारण आपल्या ओळखीची व्यक्ती यांसारख्या मोठ्या माणसांच्या परिचयाची आहे. मला अजून दोन गोष्टी आवर्जून नमूद कराव्याशा वाटतील, एक म्हणजे मेहता पब्लिशिंग हाऊस आणि दुसऱ्या तुमच्या पत्नी. मेहता सरांचे तुमच्याशी असणारे नाते खूप सुंदर आहे. तुमच्यासारख्या व्यक्तीच्या त्या पत्नी आहेत म्हणून त्या सुंदर आहेत हे म्हणणे चुकीचे आहे; कारण तुमचे आयुष्य सुरळीत चालावे यासाठी त्यांनीही अपार कष्ट घेतले आहेत, हेही तितकेच खरे, हे मान्य करावे लागेल.

श्रद्धा व अंधश्रद्धा याविषयीचे तुमचे विचार १०० टक्के बरोबर आहेत.

पुस्तकात तुम्ही लिहिलेल्या बालपणीच्या आठवणी (गणित विषय) वाचकास त्यांच्या बालपणीची आठवण करून देतील; परंतु पुढच्या आयुष्यात तुमच्या स्वभावाने अनेक मंडळी (गरीब, श्रीमंत(मनाने), नामवंत) तुमच्याशी जोडली गेली हा भाग वेगळा.

शेवटी इतकेच म्हणेन, व्यवसायाने जरी आपण मोठे डॉक्टर असलात तरी डॉक्टर कम रायटर ही भूमिका तुम्ही चोख पार पाडली आहे.

तुम्हाला माझ्याकडून व माझ्या परिवाराकडून भरभरून शुभेच्छा! वयाच्या ८०व्या वर्षी जेवढा तजेला आहे, हा पुढेही राहो, हीच प्रार्थना.

**– सुषमा आत्माराम शार्दुल**

**मना सर्जना**

लेखक - डॉ. अनिल गांधी । पृष्ठे - २४० । किंमत : २००/- रु.


◆



उत्तम अनुवादाचा **भा. रा. भागवत पुरस्कार 'कांगारू देशीच्या गोष्टी'** मालिकेतील **'नववर्षाची अनपेक्षित भेट'** या पुस्तकास देण्यात आला. बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या समारंभात **नगरसेविका माधुरी सहस्रबुद्धे** यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना **अनुवादक मालविका आमडेकर.**




**बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड** यांनी **मेहता पब्लिशिंग हाऊसला** नुकतीच सदिच्छा भेट दिली. त्या वेळी त्यांचं स्वागत करताना **प्रॉडक्शन विभागाच्या प्रमुख राजश्री देशमुख.**




**कोपरगाव येथील भि. ग. रोहमारे ट्रस्टतर्फे** दिला जाणारा २०१८ या वर्षीचा ग्रामीण समीक्षा विभागासाठीचा **'भि. ग. रोहमारे राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य पुरस्कार 'डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास'** या कीर्ती मुळीक आणि अप्पासाहेब जकाते यांनी संपादित केलेल्या पुस्तकास जाहीर झाला आहे. या पुस्तकाला या पूर्वी आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा सन २०१८ या वर्षातील **'उत्कृष्ट गद्य साहित्यकृती पुरस्कार'**ही प्राप्त झाला आहे.


**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. CSO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/12/2019 Posting Date : 11/12/2019


## नवं कोरं












**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,